जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जिल्ह्यातील २४ अवैध दारू विक्रेत्यांवर छापेमारी, १ लाख ३६ हजार ८४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर - पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि.किरणकुमार कबाडी यांनी नेमलेल्या विविध ५ पथकांनी जिल्ह्यामधील अवैध धंद्यांवर धाडसत्र सुरु करत २४ अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई केली आहे. या कारवाईत १ लाख ३६ हजार ८४२ रुपयांचा मुद्देमाल या पथकाने जप्त केला आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई साठी पो.नि. कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो. नि. हरिष भोये, उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार सुरेश माळी, विष्णु भागवत, विजय पवार, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, सुयोग सुपेकर दिपक घाटकर, राहुल द्वारके, शाहिद शेख, गणेश धोत्रे, रिचर्ड गायकवाड, भिमराज खर्से, अमोल कोतकर, भाऊसाहे काळे, बाळासाहेब खेडकर, भगवान थोरात, किशोर शिरसाठ, विशाल तनपुरे, रोहित येमुल, प्रकाश मांडगे, रमिजराजा आत्तार यांची ५ विविध पथके तयार करून त्यांना कारवाईसाठी पाठविले होते.

या पथकातील पोलीस अंमलदार यांनी शिर्डी, एम.आय.डी.सी. संगमनेर तालुका, नेवासा, श्रीगोंदा, आश्वी, कोतवाली, श्रीरामपुर शहर, सोनई, राहुरी, तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू विक्रेत्यांची माहिती काढुन ३१ मार्च रोजी एकाच दिवसात २४ ठिकाणी छापे टाकुन कारवाई करत १ लाख ३६ हजार ८४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी शिर्डी ५, एम.आय.डी.सी. १, सोनई २, संगमनेर तालुका २, राहुरी २, श्रीगोंदा १, आश्वी २, कोतवाली १, श्रीरामपुर शहर ४, तोफखाना १ असे २४ गुन्हे दाखल केले आहेत.



डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक सुरेश बनसोडे यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, नगरसेवक मयूर बांगरे, सुनील शिंदे, जयंत गायकवाड, प्रा. विलास साठे, किरण दाभाडे, अंकुश मोहिते, समीर भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, येसुदास वाघमारे आदींसह समितीचे पदाधिकारी.

# बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचे नगरमध्ये आयोजन, समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड, अध्यक्षपदी सुरेश बनसोडे

नगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक सुरेश बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच मार्गदर्शक पदी अशोकराव गायकवाड, कार्याध्यक्ष पदी सुमेध गायकवाड, निमंत्रक पदी अजय राव साळवे, सचिव पदी किरण दाभाडे यांची निवड करण्यात आली. या महोत्सवाची सुरुवात ९ एप्रिलपासून होणार असून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत आयोजकांनी सांगितले की, यंदा जयंती मोठ्या उत्साहात आणि एकजुटीने साजरी केली जाणार आहे. शहरातील तसेच उपनगरातील सर्व मंडळांचा या महोत्सवात सहभाग असणार असून, पूर्णाकृती पुतळ्यासमोरील मैदानावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महोत्सवानिमित्त चित्रकला, रांगोळी, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. १४ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ती शांततेच्या मार्गाने पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात ९ एप्रिल रोजी गायक आनंद शिंदे यांचा गायनाचा कार्यक्रम तसेच ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंतीही समितीच्या वतीने साजरी करण्यात येणार आहे.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुरेश बनसोडे यांनी सर्वांचे आभार मानून शहरातील आंबेडकरी समाजासह सर्व नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. नगरसेवक मयूर बांगरे यांनी १४ एप्रिल हा दिवस केवळ सुट्टी म्हणून न साजरा करता एकत्र येऊन जयंती उत्साहात साजरी करण्याचे आवाहन केले. जयंती महोत्सव सुमारे पंधरा दिवस चालणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी सर्वानुमते डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक सुरेश बनसोडे यांची निवड करण्यात आली. समितीची सविस्तर रचना पुढीलप्रमाणे- मार्गदर्शक - अशोक गायकवाड, कार्याध्यक्ष - सुमेध गायकवाड, निमंत्रक - अजय राव साळवे, सचिव - किरण दाभाडे, उपाध्यक्ष - विशाल गायकवाड, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, अमित काळे, सुजित घंगाळे, विनोद भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, जय कदम, विजय गायकवाड, दीपक लोंढे, सुनील कांबळे, अक्षय भिंगारदिवे, विजय भिंगारदिवे, विशाल कांबळे, सागर ठोकळ.

क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख - प्रा जयंत गायकवाड , प्रा विलास साठे , प्रा जाधव एल बी , प्रा डी आर जाधव, प्रा. पगारे सर, प्रसिध्दी प्रमुख - महेश भोसले , सचिन मोकळं , संदीप शिंदे, सल्लागार - जेवियर भिंगारदिवे, लॉरेन्स स्वामी, नगरसेवक मयूर बांगरे, संभाजी भिंगारदिवे, सुनील शेत्रे, सुनील साळवे, परिमल निकम ,संजय जगताप, प्रवीण चाबुकस्वार, विजय गव्हाळे, महेंद्र राजगुरू, अँड संदीप पाखरे, दीपक अमृत, विजय भांबळ, सुनील शिंदे, सदाशिव भिंगारदिवे, जयाताई गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, किरण गायकवाड, दीपक पाटोळे , दीपक अमृत, मिरवणूक नियोजन समिती- शुभम भिंगारदिवे, राजू दाभाडे, विशाल साळवे, आकाश सरोदे, अजय शेळके, जय कदम, सुजित घंगाळे, विशाल गायकवाड, सिद्धांत वाकचौरे, समीर भिंगारदिवे, संजय साळवे आदीवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# पंपावर दरफलक लावणे व बिल देणे बंधनकारक, गॅस दरवाढीवर प्रशासनाकडून तातडीची कारवाई

## अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा-टॅक्सी संघटनेच्या मोर्च्यानंतर पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक



एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने काढलेल्या मोर्च्याची प्रशासनाने तातडीने दखल घेत पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

नगर - एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने काढलेल्या मोर्च्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. फेब्रुवारी २०२६ पूर्वी ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर असलेला एलपीजी गॅस दर युद्धानंतर वाढत जाऊन सध्या १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या दरवाढीमुळे रिक्षा चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गॅस कंपन्यांकडून मनमानी दरवाढ होत असल्याचा आरोप करत, वाहनांमध्ये गॅस भरताना कमी ऍव्हरेज मिळत असल्याने हेराफेरी होत असल्याचीही तक्रार मांडली. रिक्षा चालक दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, मात्र वाढत्या दरांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे.

बैठकीदरम्यान पुरवठा अधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कंपनीकडून ज्या दराने गॅस व पेट्रोल पुरवठा होतो, त्याच दराने ग्राहकांना वितरण करावे. दरफलक (रेट बोर्ड) पंपावर दर्शनीय ठिकाणी लावावा. प्रत्येक ग्राहकाला गॅस भरण्यानंतर बिल देणे अनिवार्य राहील. दरम्यान, संघटनेच्या वतीने शहरातील एचपी व इंडियन ऑइलचे बंद असलेले गॅस पंप तातडीने सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. या बैठकीस शहर पुरवठा तहसीलदार सपना बहुते, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नासीर खान, सुधाकर साळवे यांच्यासह रिक्षा चालक उपस्थित होते.

# नगरमध्ये जिम ट्रेनरला धमकावत बेदम मारहाण; एका पोलिस कर्मचाऱ्यासह दोघांवर गुन्हा दाखल

नगर - जिममध्ये व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या महिलांकडे एकटक पाहिल्याचा जाब विचारल्यामुळे एका जिम ट्रेनरला बेदम मारहाण केल्याची घटना शहरातील कोठला चौक परिसरात ३१ मार्च रोजी रात्री घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पोलीस दलातील अंकुश जाधव आणि त्यांचा साथीदार विवेक आहिरे यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत सदाम हुसेन इद्रीस शेख यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सावेडी परिसरातील एका जिममध्ये व्यवस्थापक आणि प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या जिममध्ये येणाऱ्या काही महिला सदस्यांनी आरोपींच्या वर्तनाबाबत तक्रार केली होती. यावरून शेख यांनी अंकुश जाधव याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, त्याने शेख यांना खोटी कारवाई करण्याची धमकी दिली.

३१ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास शेख हे कोठला चौक परिसरात गेले असता, आरोपींनी त्यांना अडवले. ओळखीचा फायदा घेऊन त्यांना चारचाकी वाहनात बसण्यास सांगितले आणि तिथेच अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर कुरेशी हॉटेलच्या पाठीमागे नेऊन दोघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. पीडित तरुण तेथून सुटून जात असताना पुन्हा नटराज हॉटेलसमोर त्याला अडवून मारहाण करण्यात आली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.

# क्रिकेटच्या वादातून कुटुंबाला लोखंडी रॉडने बेदम मारहाण, चौघे जण जखमी, गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील भातोडी गावात क्रिकेटच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर बेदम मारहाणीत झाले आहे. या घटनेत लाकडी दांडके आणि लोखंडी रॉडचा वापर करण्यात आला असून, हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेश्मा दिलावर शेख (वय ४२, रा. भातोडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ३१ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास जुन्या वादाची कुरापत काढून आरोपी शकील बबलू सय्यद, दगडू अब्दुलरहेमान शेख, फिरोज नजीर सय्यद आणि अरमान फिरोज सय्यद (सर्व राहणार भातोडी) हे हातामध्ये लाकडी दांडके, लोखंडी पाईप आणि रॉड घेऊन आले. त्यांनी फिर्यादीच्या नातेवाईकाने क्रिकेट स्पर्धेच्या वेळी केलेल्या वादाचा आणि मोबाईल फोनवर संपर्क साधल्याचा जाब विचारला.

यावेळी आरोपींनी अत्यंत हीन भाषेत शिवीगाळ करत फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाला धमकावले. वादाचे स्वरूप वाढल्याने आरोपींनी हातातील शस्त्रांनी बेदम मारहाण सुरू केली. या हल्ल्यात फिर्यादी, फिर्यादीची आई, मुलगा आणि भावजयी हे जखमी झाले आहेत. फिर्यादीच्या हाताच्या बोटावर लोखंडी रॉडचा जोरात फटका बसल्याने त्यांचे बोट मोडले असून गंभीर स्वरूपाची दुखापत झाली आहे. याबाबत रेश्मा शेख यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी चार जणांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (२), ११८ (१), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार लोखंडे करत आहेत.

## केडगावात तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - तरुणाने आपल्या राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना केडगाव उपनगरातील शास्त्रीनगर परिसरात १ एप्रिल रोजी दुपारी १२ च्या सुमारास उघडकीस आली आहे. गौरव विजय केदारे (वय २०, रा. शास्त्रीनगर, केडगाव) असे या मयत तरुणाचे नाव आहे.

गौरव याने राहत्या घरात गळफास घेतल्याचे दुपारी निदर्शनास आले. त्यास त्याचा भाऊ हर्षल विजय केदारे यांनी तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. यादव यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. गाडीलकर हे करीत आहेत.

## श्रीमती आशाबाई देशमुख यांचे निधन

नगर - चौपाटी कारंजा, चितळे रोड येथील रहिवासी श्रीमती आशाबाई अरुण देशमुख (वय ७७) यांचे २ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कारसर करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, ३ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. आशाबाई या मंदार, केदार देशमुख, वैशाली माळवदे, मनिषा पांडे, अमीता नानीवाडेकर यांच्या मातोश्री होत.

## सुर्यकांत कवडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - ठाणे येथील रहिवासी सुर्यकांत भाऊसाहेब कवडे (वय ८१) यांचे २५ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जवाहर बाग दादोजी कोंडदेव स्टेडीयम समोर ठाणे पश्चिम अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रेल्वे अधिकारी म्हणून त्यांनी काम केले होते. लता कवडे यांचे पती तर तन्वी हर्षल जोशी यांचे वडील होत.



हनुमान चालिसा पाठ

शुक्रवार दि. ३/४/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर

वीर बजरंगी प्रतिष्ठान, प्रशांत नगर, पाईपलाईन रोड, भिस्तबाग, सावेडी, विनल करंजकर ८१८०००८२७४
अजिंक्य भालेराव ८९९९०१७५००

# व्यापाऱ्यावर जमावाकडून भरदिवसा प्राणघातक हल्ला

## लालटाकी परिसरातील घटना, ३ वर्षापूर्वीही कापडबाजारात झाला होता चाकू हल्ला

नगर - शहरातील लालटाकी परिसरात रिक्षा चालकाने अचानक यू टर्न घेतल्यामुळे दुचाकी रिक्षाला धडकून झालेल्या अपघातानंतर वाद होऊन कापड बाजार येथील व्यापारी दीपक नवलानी यांच्यावर जमावाने हल्ला करत त्यांना मारहाण केली. १ एप्रिल रोजी दुपारी चार ते साडेचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. जखमी नवलानी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघात व त्यानंतर मारहाणीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. तीन वर्षांपूर्वी नवलानी यांच्यावर बाजारपेठेत चाकू हल्ला करण्यात आला होता.

याबाबत जखमी नवलानी यांच्या पत्नी सौ. कनक नवलानी यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या मुलासोबत मोपेडवर दातांच्या दुखण्याबाबत रुग्णालयात जात होत्या. अप्पू हत्ती चौकात त्यांच्या पुढे एका रिक्षा चालकाने अचानक यु टर्न घेतल्याने त्यांची मोपेड रिक्षावर आदळली. याचा जाब रिक्षा चालकाला विचारला असता तो उद्धटपणे बोलू लागला. त्यानंतर तेथे एक तरुण मोटारसायकल वर आला आणि त्यानेही फिर्यादी सोबत गैरवर्तन केले. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याचे पती दीपक नवलानी यांना फोन करून सांगितले. ही माहिती मिळताच नवलानी तातडीने तेथे गेले. त्यांनी रिक्षाचालक व त्या अनोळखी तरुणाला जाब विचारला असता सुरुवातीला किरकोळ वाद होऊन बाचाबाची झाली. मात्र, काही वेळातच मोठा जमाव जमला व जमावातील काही युवकांनी नवलानी यांच्यावर हल्ला चढवला. त्यांना मारहाण करण्यात आली. घटनेनंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या डोक्याला पाच टाके पडले आहेत. या हाणामारीत सोन्याची साखळी व इतर दागिनेही गहाळ झाले आहेत.

पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जमावाला पांगवले. घटनास्थळावरून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत. त्यानुसार तपास सुरू करण्यात आला आहे. तीन वर्षापूर्वी नवलानी यांच्यावर कापड बाजारात दुकानजवळील विक्रेत्याशी झालेल्या वादातून चाकूने वार करण्यात आले होते. आता पुन्हा एकदा त्यांच्यावर जमावाकडून हल्ला झाला आहे. या हल्ल्यामागे अपघाताचे कारण दिसत असले तरी ३ वर्षापूर्वी झालेल्या वादाची या हल्ल्याला किनार असल्याची चर्चा व्यापारी वर्गात आहे. या प्रकरणी पोलिसांनी अनोळखी युवकांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरु आहे.

# एसटी आगारातील कथित भ्रष्टाचाराविरोधात कार्यालयासमोर अर्धनग्न आमरण उपोषण सुरू

## तात्काळ कारवाई न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडणार



सर्जेपुरा रामवाडी येथील एसटी महामंडळाच्या कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक सुधीर ठोंबरे यांनी श्रीगोंदा आगारातील कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ अर्धनग्न अमरण उपोषण सुरू केले आहे.

नगर - सर्जेपुरा रामवाडी येथील एसटी महामंडळाच्या कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक सुधीर ठोंबरे यांनी श्रीगोंदा आगारातील कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ अर्धनग्न अमरण उपोषण सुरू केले आहे. संबंधित प्रकरणात कारागीरावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. या उपोषणावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, अण्णा राऊत, अमित शेटे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हंटले आहे की, श्रीगोंदा आगारातील कारागीर यांनी शहरातील ऑटोमोबाईल दुकानांमधून बोगस बिले तयार करून लाखो रुपयांचे साहित्य खरेदी केल्याचा बनाव करत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहिती मागविण्यात आली असता संबंधित कागदपत्रांमध्ये अपूर्ण माहिती आढळून आली. तसेच सादर केलेल्या बिलांमध्ये अनियमितता दिसून येत आहे तसेच सर्व बिलांवर डेपो मॅनेजर यांच्या देखील सह्या आहे त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# विनायकनगर परिसरात ४-५ ठिकाणी चोरी, घरफोडीचा प्रयत्न

## चोरट्यांमुळे रहिवाशांच्या जीवाला धोका, उपाययोजनांची महिलांची मागणी

नगर - शहरातील विनायकनगर परिसरातील समता कॉलनीत १ एप्रिल रोजी पहाटे काही चोरट्यांनी ४ ते ५ घरांमध्ये घुसून उचकापाचक करत चोरीचा प्रयत्न केला आहे. हे चोरटे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहेत. या चोरट्यांच्या मुळे परिसरातील रहिवासी भयभीत झाले असून चोरट्यांपासून जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने उपाययोजना करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील महिला व नागरिकांनी केली आहे.

विनायकनगरच्या समता कॉलनीत १ एप्रिल रोजी पहाटे ३ ते ४ च्या सुमारास काही चोरटे तोंडाला फडके गुंडाळून आले. त्यांनी या कॉलनीतील मदने, तुरे, फुलसौंदर व हिवाळे यांच्या घरात घुसून घरातील सामानाची उचकापाचक करत चोरीचा प्रयत्न केला. सुदैवाने यावेळी चोरट्यांच्या हाताला काहीही मौल्यवान ऐवज लागला नाही. त्यामुळे त्यांनी तेथून काढता पाय घेतला. सकाळी ही घटना लक्षात आल्यावर परिसरातील रहिवाशांमध्ये घबराट पसरली. परिसरात असलेल्या सीसीटीव्हीचे फुटेज पाहिले असता त्यात सदर चोरटे दिसून आले. नागरिकांनी ही बाब कोतवाली पोलिसांना कळविल्यावर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत सीसीटीव्ही फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे. त्यानंतर ज्यांच्या घरी चोरीचा प्रयत्न झाला ते विशाल मदने यांच्या सह परिसरातील रहिवासी महिला व नागरिकांनी पोलिसांना तक्रार अर्ज दिला आहे. चोरीच्या या प्रयत्नामुळे नागरिक भयभीत झालेले असून त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यापुढे काही अनुचित प्रकार घडला तर त्यास पोलिस प्रशासन जबाबदार असेल, त्यामुळे पोलिसांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी, पुन्हा चोरीच्या घटना होऊ नयेत यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी परिसरातील महिला व नागरिकांनी पोलिसांना दिलेल्या तक्रार अर्जात केली आहे.

## माळीवाड्यात तलवार घेवून फिरणाऱ्याला पकडले

नगर - शहरातील माळीवाडा परिसरातील शिवम प्लाझा टॉकीजचे गेट समोर कसल्या तरी नशेत धारदार तलवार घेवून फिरणाऱ्याला कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. त्याच्या कडून तलवार जप्त करण्यात आली आहे. ३१ मार्च रोजी सायंकाळी ६.१५ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.

माजीद उर्फ आलम आसिफ खान (वय ३७, रा. पांचपीर चावडी) असे या आरोपीचे नाव आहे. माजीद खान हा माळीवाडा परिसरातील शिवम प्लाझा टॉकीजचे गेट समोर कसल्या तरी नशेत धारदार तलवार घेवून फिरत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शोध पथकातील महिला पो. हे.कॉ. रोहिणी दरंदले व पथक तातडीने तेथे गेले. त्यांना माजीद खान हा संशयास्पद रित्या वावरताना आढळून आला. पोलिस त्यास पकडण्यासाठी जात असताना तो पळून जावू लागला. मात्र पथकाने त्याला झडप घालून पकडले. त्याच्या कडून तलवार जप्त करण्यात आली. त्याच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### डास चावल्यास करा हे उपाय

उन्हाळा आणि पावसाळ्यात डासांचा त्रास खूप वाढतो. डास चावल्यावर त्वचेवर लालसर सूज येते आणि तीव्र खाज सुरू होते. अनेकदा ही खाज इतकी वाढते की त्वचा चोळल्यामुळे जखमही होऊ शकते. पण घरच्या घरी काही सोपे उपाय केल्यास डास चावल्यावर होणारी खाज आणि सूज पटकन कमी होऊ शकते. डास चावलेल्या जागेवर बर्फाचा तुकडा हलक्या हाताने २-३ मिनिटे लावा. बर्फामुळे त्या भागातील सूज आणि खाज दोन्ही कमी होतात. थंडावा मिळाल्यामुळे त्वचेची जळजळही कमी होते. मधामध्ये नैसर्गिक अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. मच्छर चावलेल्या जागेवर थोडासा मध लावल्यास खाज कमी होते आणि संसर्ग होण्याचा धोका कमी होतो. कोरफडीचा ताजा गर किंवा अलोवेरा जेल मच्छर चावलेल्या जागेवर लावल्यास त्वचेला थंडावा मिळतो. त्यामुळे खाज आणि सूज दोन्ही कमी होतात. डास चावल्यावर लगेच हे सोपे घरगुती उपाय केल्यास खाज आणि सूज काही मिनिटांत कमी होऊ शकते. हे सोपा उपाय करून बघा आराम वाटेल.

## पाककला

### पनीर भुर्जी

**साहित्य** – २०० ग्रॅम किसलेले किंवा कुस्करलेले पनीर, १ मोठा कांदा, १ टोमॅटो, २ हिरव्या मिरच्या, आले-लसूण पेस्ट, हळद, तिखट, गरम मसाला आणि कोथिंबीर.

**कृती** – कढईत तेल गरम करून त्यात जिरे, चिरलेला कांदा आणि मिरची परतून घ्या. कांदा गुलाबी झाला की आले-लसूण पेस्ट आणि टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा.

आता हळद, तिखट, चवीनुसार मीठ आणि गरम मसाला टाका. सर्वात शेवटी पनीर घालून २-३ मिनिटे परता. वरून भरपूर कोथिंबीर टाकून गरमागरम चपाती किंवा पावासोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### समृद्धीसाठी चिन्ह

घराचा मुख्य दरवाजा हा अत्यंत म हत्त्वाचा मानला जातो. कारण याच दरवाजातून घरात सकारात्मक ऊर्जा, आनंद आणि समृद्धी प्रवेश करते. त्यामुळे मुख्य दरवाज्याची स्वच्छता, सजावट आणि त्यावर लावलेली शुभ चिन्हे यांना विशेष महत्त्व दिले जाते.

हिंदू धर्मात स्वस्तिक हे अतिशय शुभ आणि मंगलमय चिन्ह मानले जाते. वास्तुशास्त्रानुसार मुख्य दरवाज्याच्या दोन्ही बाजूंना लाल किंवा पिवळ्या रंगात स्वस्तिक काढल्यास घरात सकारात्मक ऊर्जा वाढते. स्वस्तिक हे भगवान गणेश आणि देवी लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते, हे चिन्ह लावल्याने घरात धन टिकून राहतो. दरवाज्याच्या आतल्या बाजूला देवी लक्ष्मीच्या पावलांचे चिन्ह काढणे अत्यंत शुभ मानले जाते.

## सौंदर्य

हिवाळ्यात त्वचा कोरडी आणि खडबडीत होऊ शकते, ज्यामुळे अनेकदा जळजळ आणि खाज सुटू शकते. ही समस्या टाळण्यासाठी, तुम्ही काही टिप्स फॉलो केल्या पाहिजेत. या हिवाळ्यात तुमची त्वचा हायड्रेट आणि लवचिक ठेवण्यासाठी येथे काही उपाय आहेत.

* हिवाळ्यात सर्वात मोठी चूक म्हणजे खूप गरम पाण्याने आंघोळ करणे, ज्यामुळे त्वचेतील नैसर्गिक तेल निघून जाते.

* आंघोळीच्या पाण्यात एक चमचा खोबरेल तेल घाला.

## सल्ला

जर मिसळीत टाकण्यासाठी तुमच्याकडे कांदा-लसूण मसाला नसेल, तर तुम्ही 'म ालवणी मसाला' किंवा 'कोल्हापुरी तिखट' वापरू शकता.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, चित्रा १९।२५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शत्रूंना मात द्याल. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल. काम व इच्छित योजनेला अमलात आणाल.

**वृषभ** : आरोग्याची काळजी घ्याल. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे तोट्याचे ठरेल.

**मिथुन** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील. दिवसभर आत्मविश्वासी राहाल.

**कर्क** : आर्थिक पक्षाबाबत सुकसान होईल. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील.

**सिंह** : आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आपल्या इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**कन्या** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : वाहने चोरीस जातील. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई केल्यास नुकसान होईल.

**वृश्चिक** : पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. सुख-शांतीचे वातावरण राहील.

**धनु** : बेपर्वाईने कार्य केल्याने नुकसान, कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल. जुने गैरसमज दूर होतील.

**मकर** : मागील एखादे बाकी राहिलेले काम आज पूर्ण होईल. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल.

**कुंभ** : हितशत्रूंवर मात कराल. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**मीन** : आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील.

## फिल्मीचक्कर क्र. १२३० सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | ३ | ४ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ५ | |
| | ■ | | ■ | ६ | | ■ | |
| ७ | | | | | ■ | ८ | |
| | ■ | | ■ | ■ | ९ | ■ | |
| १० | ११ | | ■ | १२ | | १३ | |
| १४ | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | १५ | | ■ | १६ | | |

**आडवे शब्द :-** १) सलमानखान, माधुरी दीक्षित, मोहनीश बहल, रेणुका शहाणे, अलोकनाथ, लक्ष्मीकांत बेर्डे यांचा गाजलेला एक चित्रपट ५) ++ फरिश्ता (चित्रपटाचे नाव) ६) ++ और रंक (चित्रपटाचे नाव) ७) सनम +++++ (चित्रपटाचे नाव) ८) राजेश ++ ('आराधना' फेम चित्रपटाचा नायक) १०) +++ आरा (एक खूपच जुना चित्रपट) १२) एक दिवंगत संवाद लेखक (रामायण फेम) १४) जय जय ++ शंकर कांटा न लगे कंकर (गाणे) १५) ++ देओल (अभिनेता) १६) जुन्या काळातील एक संगीतकार

**उभे शब्द :-** १) ++ + +++++ हैं सदीयों पुराने चाहे तू माने चाहे न माने २) राजेश खन्ना, मुमताज यांचा एक चित्रपट ३) वह ++ थी? (चित्रपटाचे नाव) ४) ++ ++ ++ हूं देश का सीपाहीं हू बोलो मेरे संग जय हिंद जय हिंद (गाणे) ६) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) ९) बीस साल ++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ स्टोरी (चित्रपटाचे नाव) १२) उषा नाईक, सुकन्या कुलकर्णी, सतीश पुळेकर, कुलदीप पवार, अनंत जोग, सुहास पळशीकर यांचा एक मराठी चित्रपट १३) +++ रोशन (अभिनेत्याचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : कासवाच्या गतीने का होईना पण रोज थोडी थोडी प्रगती करा, खूप ससे येतील आडवे, बस त्यांना हरवायची हिंमत ठेवा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'टार्टअप' म्हणजे नेमके काय?

स्टार्टअप कंपनी हा शब्द गेल्या दहा वर्षात अनेकदा तुमच्या कानावर पडला असेल.तुमच्यापैकी काहीजण एखाद्या यशस्वी स्टार्टअपचे कर्मचारी असण्याची पण शक्यता आहे.या कंपन्या नक्की काय करतात आणि त्या वेगाने का वाढतात हे समजायचे असेल तर तुमच्या रोजच्या ओळखीतल्या काही कंपन्यांची नावे सांगतो. इन्स्टाग्राम - उबर - पेटीम - झोमॅटो - बायजू - न्याका

ही नावं वाचल्यावर तुम्ही म्हणालच की या तर फार मोठ्ठ्या कंपन्या आहेत. होय अगदी बरोबर पण त्या आता मोठ्या आहेत.एकेकाळी त्या छोट्या स्टार्टअप कंपन्याच होत्या.आता पुन्हा नवा प्रश्न मनात येईल तो असा की सगळ्याच कंपन्या आधी लहान असतात मग त्या कंपन्या आणि स्टार्टअप या दोन्हीत फरक काय ?एकच महत्वाचा फरक म्हणजे या सगळ्या कंपन्या अद्यावत संगणक प्रणालींचा वापर हा या कंपन्यांच्या अस्तित्वाचा कणा असतो. चला तर आज समजून घेऊ या स्टार्टअप म्हणजे काय?

स्टार्टअप कंपनी म्हणजे एक नवीन,लहान व्यवसाय जो एक नाविन्यपूर्ण उत्पादन किंवा सेवा देण्यासाठी किंवा विशिष्ट बाजारपेठेतील काही समस्या सोडवण्यासाठी सुरु केला जातो. स्टार्टअप्सचा व्यवसाय जलद गतीने वाढण्याची शक्यता गेल्या काही वर्षात दिसून आल्यामुळे गुंतवणूक करणाऱ्या स्टार्टअपमध्ये आर्थिक गुंतवणूक कंपन्यांची संख्या वाढत जाते आहे.

व्यवसायाच्या पहिल्या टप्प्यात स्टार्टअप्स कंपन्या त्यांच्या उत्पादनांची किंवा सेवांची चाचणी करतात, ग्राहकांकडून प्रतिसाद घेतात आणि बाजारपेठेत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

१. नाविन्य : स्टार्टअप्स एक नवीन उत्पादन किंवा सेवा आणण्याचा प्रयत्न करतात, किंवा रोजच्या समस्यांवर नव्याने उपाय शोधून काढतात.

२ विस्ताराची क्षमता : स्टार्टअप्समध्ये व्यवसाया मोठ्या प्रमाणात वाढण्याची दाट शक्यता असते. त्या वाढीचे प्रमाण म्हणजे ड्लरश्ररलळश्रळीं

३. जोखीम : स्टार्टअप्समध्ये सामान्यतःमोठी जोखीम असते कारण त्यांचे मॉडेल्स निश्चित करण्यात वेळ जाऊ शकतो.त्यांना त्यासाठी बाजारपेठेत स्वतःला सिद्ध करावे लागते. काहीवेळा असेही होते की मॉडेल्स निश्चित होताहोताच जुने होते.

४. तंत्रज्ञानाचा वापर :

अनेक स्टार्टअप्स संगणकीय तंत्रज्ञानावर आधारित असतात आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ते जुन्या व्यवसायातील प्रक्रिया सुलभ करतात किंवा नव्याने बनवतात.

५ संकल्पना (Concept) : एक स्पष्ट खात्रीलायक संकल्पना किंवा व्यवसायाचा स्पष्ट आणि स्वच्छ दृष्टीकोन ही स्टार्टअपची मुख्य आवश्यक आहे, ज्यामुळे स्टार्टअप्स आपले उद्दिष्ट कमी वेळात साध्य करू शकतील.

६ संघटन (Team) : आधुनिक तंत्राशी घट्ट ओळख असणारा आणि उद्दीष्टांसाठी समर्पित कर्मचार्यांची टीम बांधणे महत्वाचे आहे.वेगवेगळ्या कौशल्यांचे अवगतीकरण आणि परस्पर पूरक असणे महत्वाचे असते.

७. गुंतवणुक (Investment) स्टार्टअप्सला त्यांच्या सुरुवातीसाठी वाढीसाठी आणि विकासासाठी भांडवलाची गरज असते, जी साधारणपणे गुंतवणूकदार किंवा वित्तीय संस्थांकडून मिळते.

हे गुणधर्म स्टार्टअप्सना त्यांच्या उद्दिष्टांच्या दिशेने पुढे जाण्यात आणि यशस्वी होण्यात मदत करतात.

## बोलण्याचा परिणाम

अनेक वर्षांपूर्वी एकदा राजा रणजितसिंग आपल्या मंत्र्यांसह आणि सैनिकांसह जंगलात शिकार करायला गेला. शिकार केल्यानंतर राजा राजवाड्यात परतत होता. राजाला खूप तहान लागली. वाटेत त्याला एक झोपडी दिसली. त्या झोपडीत एक आंधळा माणूस राहत होता. राजाने त्याच्या सैनिकाला झोपडीतून पाणी भरून आणण्यासाठी पाठवले.

सैनिक झोपडीत पोहोचला आणि आंधळ्याला म्हणाला, अरे आंधळ्या! मला पिण्यासाठी एक भांडे पाणी दे. आंधळा म्हणाला, मी तुझ्यासारख्या लोकांना एक थेंबही पाणी देत नाही. सैनिक रिकाम्या हाताने राजाकडे परतला.

राजाने त्याच्या मंत्र्याला पाणी आणण्यासाठी झोपडीत पाठवले. मंत्री झोपडीत पोहोचला आणि म्हणाला, महाराज! मला पाण्याचा एक भांडे मिळेल का? आंधळा म्हणाला, माफ करा! मंत्री, मी तुम्हाला पिण्यासाठी पाणी देऊ शकत नाही. दुसरीकडे कुठेतरी पाण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करा.

मंत्रीही झोपडीतून रिकाम्या हाताने परतला. राजा स्वतः झोपडीत पोहोचला, त्याने हात जोडून म्हटले, महात्मा! माझ्यासारख्या लहान प्राण्याला पाणी प्यायला मिळेल का? तहानेने माझा घसा कोरडा पडत आहे. तुम्ही माझ्यावर खूप उपकार कराल.

राजाचे हे शब्द ऐकून तो आंधळा राजाला म्हणाला, हे राजा! मी तुमच्यासाठी सर्वस्व अर्पण करण्यास तयार आहे. त्याने राजाला पाणी प्यायला दिले आणि म्हणाला, महाराज! जर दुसरी काही सेवा करू शकत असाल तर मला सांगा.

राजा म्हणाला, तुम्ही माझा सैनिक आणि सेवक कसा ओळखला? तो आंधळा म्हणाला, प्रत्येक व्यक्तीचे वास्तव त्याच्या बोलण्याच्या पद्धतीवरून कळते.

तात्पर्य : व्यक्तीची भाषा त्याची ओळख करून देते. नेहमी गोड बोलावे.

## जीवन का अमृत (भाग १)



१. आत्मा युगों-युगों से कैदी बनी हुई है और केवल सत्गुरु की दया से ही यह मुक्त हो सकती है। कोई और रास्ता नहीं है । अब आप रास्ते पर हैं। भजन- सिमरन आंतरिक उन्नति में सहायता करता है। यह सांसारिक मोह का इलाज है । जितना ज्यादा नामलेवा अंतर में तरक्की करता है, उतना ही सांसारिक वस्तुओं से उसका मोह कम हो जाता है। समय आने पर सत्गुरु की दया से सारा मोह खत्म हो जाएगा ।

२. हमारी आत्मा इस जड़ संसार से जुड़ बैठी है, जड़ता के असर पा-पाकर । जब तक बहिर्मुखी इंद्रियों को बस में नहीं किया जाता और आत्मा को जिंदगी के झंझटों से दूर नहीं किया जाता, आत्मा देहाभास से ऊपर नहीं आ सकती । आत्मा को देह से अलग करने के लिए, यह जरूरी है कि हमारी शक्तियाँ अंतर और ऊपर की ओर प्रवाहित हो, अंतर्मुख होने की और आत्मा-विश्लेषण की प्रक्रिया द्वारा ।

### मन और आत्मा

३. जब आप कोई काम करें, तो उसमें पूरी तरह खो जाएँ और जब आपके पास कोई काम न हो, तो अपने मन को इधर-उधर न भटकने दें, इसे खाली न रहने दें, क्योंकि जैसा कि कहा जाता है, खाली दिमाग, खालाजी का घर। आप दिन और रात के खाली समय में या तो पाँच पवित्र नामों का जाप करते रहें या मन को सत्गुरु की मीठी याद में लगा के रखें, चाहे आप कहीं भी हों, या फिर सुरीले शब्द के मिठास को सुने, यदि यह सुनाई दे तो । इस प्रकार फालतू विचारों के लिए कोई समय नहीं बचेगा और ये आपके भजन सिमरन में कोई विघ्न नहीं डालेंगे ।

***

४. अनायास ही बह निकालने वाले आँसू मन की मैल को उतारने में बहुत सहायक होते हैं और धन्य हैं वे आँखें, जिनसे ये बहते हैं, क्योंकि ये ना खत्म होने वाला आनंद और शांति पीछे छोड़ जाते हैं । यह सत्गुरु की दया है कि वह अपने बच्चों को याद करता है और श्रद्धालु एवं आज्ञाकारी बच्चे उसके प्रेम को वापिस लौटाते हैं और दया और कृपा के महासागर से फायदा उठाते हैं

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

बनू नये. आपलं स्वतःशी सुंदर नातं असेल तर आपल्या आत्म्याची शक्ती वाढते. जेव्हा सशक्त आत्मा इतरांशी संवाद साधतो तेव्हा त्याची नाती पक्की होतात..

ध्यान आणि चिंतन

मला स्वतःला पाहायचं आहे... प्रत्येक विचार एक बीज आहे... ह्या बीजातून माझं शरीर, नाती, काम आणि मी निभावत असलेली प्रत्येक भूमिका उदयास येते, निर्माण होते... हे बीज माझा प्रत्येक विचार आणि भावना - माझी निर्मिती आहे... झाड सशक्त होण्यासाठी मी सशक्त बीज पेरीन... माझा प्रत्येक विचार शुद्ध, पवित्र, प्रेमळ, शक्तिशाली आणि पूर्णपणे नियंत्रणात आहे... मी परिस्थितीच्या परिणामांच्या वरचढ असेन... असं बीज माझं शरीर आणि नाती निरोगी बनवेल... आजपासून मी, केवळ झाडासाठी कष्ट घेणार नाही... तर मी बीजाकडेही लक्ष देईन... ओम शांती!

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

आत्मा म्हणजे बीज आहे. हे बीज जी ऊर्जा निर्माण करतं तिचा आपल्या भावनिक, शारीरिक स्वास्थ्यावर आणि नात्यांवर प्रभाव पडतो.

जेव्हा आपण भावनिकदृष्ट्या कमकुवत असतो तेव्हा आपले इतरांबद्दलचे विचार आणि वागणं नकारात्मक बनतं. आपण इतरांना नकारात्मक तरंग पाठवतो. त्यांच्याकडून अनपेक्षितपणे झालेल्या कृतींवर आपण स्थिर राहून प्रतिक्रिया देऊ शकत नाही आणि आपली नाती कमकुवत होतात.

एखाद्या माणसाचं वागणं आपण स्वीकारू शकलो नाही आणि त्याला प्रतिक्रिया दिली तर आपली शक्ती कमी होते. ह्याचा परिणाम आपल्या इतर चांगल्या नात्यांवरही होतो.

स्वतःत केलेल्या स्वतःत बदल करण्याची ही प्रक्रिया इतरांशी तुलना न करता फक्त स्वतःच्याच संदर्भांनी तपासली पाहिजे. छोट्याशा बदलासाठीही आपण स्वतःचं कौतुक केलं पाहिजे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मास्तर : सांग गण्या, जर तुझ्याकडे ५ इडल्या आहेत आणि मी ५ इडल्या खाल्ल्या, तर तुझ्याकडे काय उरले?

गण्या : सांबर अणि चटणी

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प बंद करण्यात यावा व एकत्र अर्थसंकल्पात त्याचा समावेश करावा अशी शिफारस केंद्राच्या कोणत्या समितीने केली होती?

– विवेक देबरॉय समिती

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### फणस

या काटेरी जाड सालीच्या आत फणसाचे गोड गरे असतात. गऱ्यामध्ये काळ्या किंवा लालसर रंगाच्या बिया असतात. यांनाच आठळ्या असे म्हणतात. फणसाचे गरे व आठळे दोन्हींमध्येही औषधी गुणधर्म आहेत. फणसाचे वजन साधारणपणे २०-२२ किलोपासून ४० किलोपर्यंत असते.

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : पिकलेला फणस शीतल, स्निग्ध, तृप्तीदायक, मधुर गुणात्मक, मांसवर्धक व बलदायक असतो. फणसाचे गरे व आठळ्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, कॅरोटिन, थायमिन, रिबोफ्लेविन, नायसिन व 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते.

आधुनिक शास्त्रानुसार : फणसामध्ये प्रथिने, मेद, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थही असतात. या सर्व गुणधर्मामुळे शरीरसंवर्धनासाठी, पचनशक्ती वाढविण्यासाठी फणसाचा उपयोग होतो.

उपयोग : १) फणसाचे गरे सुकवून नंतर त्याचे दळून पीठ करून त्याची पातळ पोळी किंवा पुरी बनविल्यास वर्षभर फणसाचा आस्वाद घेता येतो.

२) लहान मुलांना ही फणसाची पोळी खाण्यास द्यावी, यामुळे त्यांच्या शरीराची वाढ चांगली होते.

फणसाच्या गऱ्यांची खीर व कढीही उत्कृष्ट होते. तसेच फणसापासून जॅम, जेली, मुरांबा तयार करता येतो. हे सर्व पदार्थ लहान मुलांना आवडतात, म्हणून या सर्व पदार्थांचा आहारामध्ये समावेश करावा. कच्च्या फणसाची भाजी बनवावी, तसेच आठळ्या ओल्या असताना त्यांची भाजी बनवावी किंवा वाफवून आंब्याच्या कोयीप्रमाणे खाव्यात.

फणसाच्या बिया सुकवून दळून त्याचे पीठ बनवावे व या पिठाचा वापर भाजीत, आमटीत रश्शासाठी करावा किंवा त्याची थालपिठे बनवावीत. हे अत्यंत पौष्टिक असल्याने अशक्तपणा, जुना ताप, कृश व्यक्ती यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# शहरात मुलींच्या हॉस्टेलसाठी जागा देणार

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे आश्वसन, माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; सेवानिवृत्त सभासदांना कृतज्ञता निधीचे वाटप



अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ आणि सेवानिवृत्त सभासदांचा कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव.

नगर – शिक्षक हे समाजाला दिशा देणारे असून सक्षम पिढी घडविण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य करतात. त्यांच्या कार्याची कृतज्ञता शब्दांत व्यक्त होऊ शकत नाही, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले. शिक्षकांमध्ये काटकसरीचा गुण असून, संचालक मंडळही त्याच पद्धतीने संस्थेचा कारभार करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच मुलींसाठी हॉस्टेल उभारण्यासाठी महापालिकेमार्फत सोसायटीला जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ आणि सेवानिवृत्त सभासदांचा कृतज्ञता सोहळा नगर–कल्याण रोडवरील जाधव लॉन्स येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या सोहळ्यास उपमहापौर धनंजय जाधव, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, संचालक बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, आप्पासाहेब जगताप, ईश्वर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह प्रा. सुनिल पंडित, भाऊसाहेब रोहोकले, विलास साठे, नंदकुमार शितोळे, शिरीष टेकाडे, सुभाष कडलग, मारुती लांडगे, उत्तम राजळे, अमोल ठाणगे, अमोद नलगे, राहुल झावरे, सुभाष भागवत, गुलाब गाडेकर, सत्यवान थोरे आदींसह सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व सभासद उपस्थित होते.

प्रास्ताविकात बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले की, २५ वर्षांनंतर सोसायटीत सत्तांतर झाले असून नवीन संचालक मंडळाचा हा पहिला कृतज्ञता सोहळा आहे. संस्थेची 'अ' वर्ग ऑडिट श्रेणी, १०,७८४ सभासद आणि ९७५ कोटी रुपयांचे कर्जवाटप झालेले आहे. संस्थेचा विकास व सभासद हितासाठी सर्व संचालक योगदान देत आहे. जिल्हा बँकेत २५० कोटींची सीसी मंजूर असून ती १०० कोटींवर आणली आहे.

निवडणुकीपूर्वी दिलेल्या शब्दाप्रमाणे साडे सहा हजार रुपयांचा थकित कृतज्ञता निधी सेवानिवृत्त सभासदांना देण्यात येत आहे. तसेच सभासदांच्या मुलांसाठी मोफत अभ्यासिका सुरू करून यूपीएससी व एमपीएससीसाठी तज्ञ मार्गदर्शन देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पारदर्शक व काटकसरी कारभारातून राज्यात आदर्श सोसायटी उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी सांगितले की, सत्तेत आल्यानंतर ट्रॉफी, कॅलेंडर, मंगल कार्यालय आदी खर्चात लाखो रुपयांची बचत करण्यात आली. २५ वर्षांनंतर सत्तांतर घडवून आणत सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, तसेच कोणतीही योजना बंद केली जाणार नाही. शहीद जवानाच्या वारसाला १ लाख रुपयांची मदत, दिवंगत सभासदांची कर्जमाफी व ठेवी परत देणे, पाल्यांच्या लग्नासाठी १५ हजार रुपये देणे असे उपक्रम राबविले जात आहेत. मुख्य शाखेत एमपीएससी मार्गदर्शन केंद्र आणि जूनपासून प्रत्येक शाखेत अभ्यासिका सुरू करण्याचा मानस आहे. महापालिकेकडून भूखंड मिळाल्यास मुलींसाठी हॉस्टेल व शिक्षक भवन उभारण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत मुलींच्या हॉस्टेलसाठी भूखंड देण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

सुनील पंडित यांनी संचालक मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

गुणवंत विद्यार्थिनी वैष्णवी व्यवहारे व वेदिका शेळके यांनी या सन्मानामुळे प्रेरणा मिळाल्याचे सांगितले.

सुभाष कडलग यांनी सोसायटीचा परिपूर्ण कारभार कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. तसेच सोसायटी स्वयंपूर्ण व्हावी व ठेव सुरक्षित राहावी यासाठी सभासदांनी ठेवी येथेच ठेवाव्यात, असे आवाहन केले.

माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी पारदर्शक कारभार कायम ठेवण्याचे आवाहन केले.

सेवानिवृत्त सभासद उत्तम राजळे व सखाराम गारुडकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीशचंद्र दळवी यांनी केले तर सुरज घाटविसावे यांनी आभार मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## नामदेव

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

संतांनी घालून दिलेला संतपथ हा भक्तिपंथ आहे आणि त्यातील भक्ती म्हणजे मुख्यतः ध्यान आणि ध्यानासाठी नामस्मरण. ध्यान म्हणजे अखंड स्मृती किंवा स्मरण पण नामाशिवाय ध्यान कसे साधणार? म्हणून नाम हेच ध्यानाचे साधन ठरते. भगवद्गीतेचा बारावा अध्याय हा भक्तियोग म्हणून प्रसिद्ध आहे. बाराव्या अध्यायात भगवंत सांगतात,

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात्
ज्ञानात ध्यानं विशिष्यते।
(गीता १२–१२)

अभ्यासापेक्षा ज्ञान गहन आहे आणि ज्ञानापेक्षाही ध्यान श्रेष्ठ आहे. यावर भाष्य करताना ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

अभ्यासाहूनि गहन।
पार्था मग ज्ञान।
ज्ञानापासोनि ध्यान विशेषिजे ।।

अर्जुना अभ्यासापेक्षा ज्ञान खोल आहे आणि ज्ञानापेक्षाही ध्यान अधिक महत्त्वाचे आहे. म्हणूनच ध्यानाला आवश्यक ठरणारे नाम हे भक्तिमार्गावरील खरे अमृत आहे. म्हणून तुकोबारायांनी नामाला देवासमोर वाहणारी 'अमृताची धार' म्हटले आहे. धारा अखंड असते आणि अमृत नावाप्रमाणे अमर असते. नाम किंवा नामस्मरणाची प्रक्रिया तशीच आहे. भक्त नामचिंतनाच्या योगाने प्रतिक्षणी आत्माकार होत असतो. मनाचे उन्मन करीत असतो. तुकोबाराय तर पुढे म्हणतात, 'मुखी नाम हाती मोक्ष' हा सिद्धांतच भक्तिमार्गातील नामतत्त्वाचे मोठेपण सांगून जातो.

प्रा. रा. द. रानडे यांनी नामस्मरणाचे चिंतन घडविताना म्हटले आहे की नामस्मरण हे परावाणीने, एकाग्रतेने, दीर्घकाल, निरंतर व सत्कारपूर्वक करणे हे नामस्मरणविषयक क्रियेतील पंचशीलच होय. अशा रीतीने नामस्मरण केल्यास देवाचे रूप आपोआप प्रकट होईल. नाम आणि रूप या दोन्ही देवाच्या उपाधी आणि देवाचे गुणधर्म असून दोन डोळ्यांना एकच वस्तू दिसावी किंवा दोन कानांना एकच नाद ऐकू यावा त्याप्रमाणे दोहोतून एकच आत्मतत्त्व व्यक्त होते. नामदेवराय तर म्हणतात,

नाम तेचि रूप, रूप तेचि नाम।
नामरूपा भिन्न नाही नाही ।।
आकाराला देव नामरूपा आला।
म्हणोनि स्थापिले नाम वेदी ।।

देव साकार होऊन नामरुपाला येत असल्याने नाम आणि रूप एकच होत. देव जोडण्यासाठी नामासारखा मंत्र नाही. मनुष्य स्वरूपतः सच्चिदानंद आत्मा किंवा ब्रह्म असून देहतादात्म्य व तन्मूलक वासना यामुळे तो जीवदशेला आला आहे. संवित किंवा जाणीव हे मनुष्याला समजू न शकणारे आत्म्याचे स्वरूप आहे. देहतादात्म्य व विषय यांचे संस्कार नष्ट करून जाणिवेवर आल्याचे संस्कार करावयाचे आहेत. हे साध्य झाले म्हणजे जीव ब्रह्मपदाला जातो. जाणिवेवरील संस्कार हे नवीन अनुभवाच्या संस्कारांनी बदलता येतात कारण संस्कार या अनुभवाच्या सूक्ष्म स्मृती आहेत. पुन्हा पुन्हा एखाद्या गोष्टीचे स्मरण झाले म्हणजे संस्कार दृढ होतात. तसे झाले नाही म्हणजे ते दुर्बल होतात. आत्म्याने संवित भरण्याचे साधन म्हणजे नामस्मरण होय.

**– किशोर गांधी**

# रुद्र गाडेकर याचे दुहेरी यश



नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबाग प्रशालेमधील इयत्ता चौथी च्या वर्गात शिकत असणारा रुद्र सतीश गाडेकर याने दोन परीक्षेत सुयश प्राप्त केले आहे. हेडगेवार प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत १७ वा तर स्टूडेंट टॅलेंट सर्च परीक्षेत केंद्रात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, शाळेच्या मुख्याध्यापिका मीना पवार यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्याला पारुनाथ ढोकळे, दीपक कराळे, जितेंद्र निकम या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

# पै. नाना डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार प्रदान

नगर – तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना जळगाव येथे पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अल्पबचत भवन, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात नंदूरबारचे उपजिल्हाधिकारी मनोज देशमुख यांच्या हस्ते डोंफ्लगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सतीश बावीस्कर, जळगाव सोसायटीचे संचालक विजय पवार, माजी मुख्याध्यापक शब्बीर शेख, एकता संघटनचे अध्यक्ष फारुक शेख, हकीम चौधरी, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख आदी उपस्थित होते.



सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन डोंगरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे.

स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी पै. नाना डोंगरे यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.




छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्टस् शूटिंग क्लबच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

# राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या ८ नेमबाजांची सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड

नगर – छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. अहिल्यानगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्टस् शूटिंग क्लबच्या तब्बल ८ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत सब नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात मुग्धा राजापुरे, किर्ती चक्रवर्ती, कार्तिकी कोकाटे, प्रिशा मुनोत आणि राजलक्ष्मी घडेकर यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर आणि स्वाती काळे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला.

खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच खेळाडूंना हे यश मिळवता आले आहे.

# विद्यार्थी हेच शिक्षकाचे खरदैवत असून तेच शिक्षकाचे योग्य मूल्यमापन करू शकतात

**दीपलक्ष्मी म्हसे**

नगर – विद्यार्थी हेच शिक्षकाचे खरदैवत असून तेच शिक्षकाचे योग्य मूल्यमापन करू शकतात असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेच्या खजिनदार ज्येष्ठ विधीज्ञ दीपलक्ष्मी म्हसे यांनी केले.



संस्थेच्या रेसिडेन्शिअल कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.सीताराम काकडे यांनी स्वेच्छा निवृत्त झाल्याबद्दल संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करताना ज्येष्ठ विधीज्ञ दीपलक्ष्मी म्हसे आदी.

संस्थेच्या रेसिडेन्शिअल कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक प्रा.सीताराम काकडे यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली. या निमित्ताने संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने श्री.काकडे यांचा गौरव व सत्कार समारंभ त्यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी त्या बोलत होत्या.

प्रा. काकडे यांच्यासारखे शिक्षक हे खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असतात व संस्थेसाठी आणि महाविद्यालयासाठी भूषण असतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी श्री. काकडे यांनी परिश्रम घेतले. तसेच विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी पुढे जावे त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा स्पर्धा परीक्षेमध्ये त्यांनी जावे नाट्य क्षेत्रामध्ये काम करावे विविध स्पर्धांमध्ये भाग घ्यावा यासाठी प्रा. काकडे नेहमीच प्रयत्नशील राहिले. त्यांनी सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. असेही त्या यावेळी बोलताना म्हणाल्या.

यावेळी बोलताना काकडे यांनी महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकी पेशा हा व्यवसाय नसून ते एक सेवा कार्य आहे. एवढे वर्ष मला विद्यार्थ्यांची सेवा करता आली हे मी माझे भाग्य समजतो, कारण शाळा महाविद्यालये आणि विद्यापीठे ही विद्यार्थ्यांसाठी आहेत. विद्यार्थी आहेत म्हणून त्यांच्या असण्याला अर्थ आहे. व शिक्षकांच्याही असण्याला अर्थ आहे, यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय मानून काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी अध्यापकाने आपले ज्ञान कायम अद्यावत ठेवावे व देशाचे भावी आधारस्तंभ मजबुतीने घडवावेत. असे आवाहनही श्री. काकडे यांनी केले.

यावेळी उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा.रवींद्र देवढे यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमासाठी संस्थेच्या सदस्य वास्तु विशारद राजश्री जगताप, प्राचार्य विजयकुमार पोकळे, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, उपमुख्याध्यापक सौ. जयश्री दरे, पर्यवेक्षक प्रा.वैशाली जाधव, पर्यवेक्षक धनंजय मस्के, पर्यवेक्षक बाळासाहेब पवार यांसह अध्यापक–प्राध्यापक बंधू–भगिनींची उपस्थिती होती. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार पोकळे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.दत्तात्रय चौधरी यांनी केले. पर्यवेक्षक प्रा.वैशाली जाधव यांनी आभार मानले.

# भास्कर रानवडे, शरद आरगडे, बाबासाहेब गेरंगे यांना 'स्मृतिशेष प्राचार्य रवींद्र पटेकर पुरस्कार' जाहीर



नगर – संयुक्त जयंती महोत्सव समिती, प्रबुद्धनगर, कल्याण रोड अहिल्यानगर यांच्या वतीने दिला जाणारा स्मृतिशेष प्राचार्य रवींद्र पटेकर संघर्षशील कार्यकर्ता पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. १९ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वा.कल्याण रोडवरील प्रबुद्धनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन या ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे. पारलिंगी समाजाच्या नेत्या दिशा पिंकी शेख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व आयु. हेमलता शिंदे–कदम यांच्या अध्यक्षतेखाली सदरील कार्यक्रम होणार आहे.

या प्रसंगी स्मृतिशेष रवींद्र पटेकर संघर्षशील कार्यकर्ता पुरस्कार भास्कर रानवडे (राहता) यांना देण्यात येणार आहे. तसेच सौंदाळा तालुका नेवासा या ग्रामपंचायतीने जातीअंताची लढाई लढण्याचा ठराव केला त्याबद्दल विशेष प्रेरणा पुरस्कार शरद आरगडे सरपंच यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच लोकांनाच आपले नागरिकत्व सिद्ध करायला लावणाऱ्या आणि समाजामध्ये धार्मिक आधारावर भेदभाव करणाऱ्या कायद्याविरुद्ध पहिला ठराव करणारी देशातील पहिली ग्रामपंचायत इसळक, तालुका नगर या गावचे तत्कालीन सरपंच बाबासाहेब गेरंगे यांना देखील विशेष पुरस्कारने सन्मानित केले जाणार आहे. अशी माहिती संयोजन समितीचे सदस्य शरद कुमार मेढे, विलास साठे, मेहबूब सय्यद, एल बी जाधव, हनुमंत गायकवाड यांनी दिली.




प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जिल्हा गुणवत्ता यादीत यशस्वी झालेले जय बजरंग विद्यालयाचे विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षकांसमवेत.

# डॉ. हेडगेवार प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जय बजरंग विद्यालयाचे विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत

नगर – डॉ. हेडगेवार प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परीक्षा २०२५–२६ मध्ये आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हा गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले आहे.

या परीक्षेत इयत्ता चौथीतील चि. दर्शन गणेश घुले याने ३०० पैकी २५० गुण मिळवत जिल्ह्यात १६ वा क्रमांक पटकावला. तर इयत्ता पाचवीतील कु. श्रीलेखा गणेश आडसरे हिने ३०० पैकी २६४ गुण मिळवत जिल्ह्यात १७ वा क्रमांक मिळवला. तसेच इयत्ता सातवीतील चि.अभिषेक प्रभाशंकर कुशवाह याने ३०० पैकी २३० गुण मिळवत जिल्ह्यात १३ वा. क्रमांक मिळवला असून चि.सिद्धेश अमोल क्षीरसागर याने ३०० पैकी २२६ गुण मिळवत जिल्ह्यात १५ वा क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल आशा एज्युकेशन फाउंडेशन चे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामागे श्रीमती कल्पना मिसाळ, श्रीमती छाया क्षीरसागर, राहुल मोरे, श्रीमती अश्विनी बेरड व भागवत पाखरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गणित व विज्ञान ऑलिम्पियाड परीक्षेत डॉन बॉस्को विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश




गणित व विज्ञान नॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत डॉन बॉस्को विद्यालय, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाची शैक्षणिक परंपरा उज्ज्वल केली आहे.

नगर – गणित व विज्ञान नॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत डॉन बॉस्को विद्यालय, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाची शैक्षणिक परंपरा उज्ज्वल केली आहे. सायन्स ऑलम्पियाड फाऊंडेशन मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये विद्यालयातील ४४ विद्यार्थी सहभागी झाले होते. १६ विद्यार्थी विज्ञान विषयासाठी प्रविष्ट झाले होते. त्यातील इयत्ता बारावी सायन्समधील प्राजक्ता सोमवंशी, मुस्कान शेख, आरोही मांजरे, उत्कर्ष पवार या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. गणित विषयासाठी २८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील जोयेल थोरात, सबा शेख, पियुष बनसोडे, सम्राट पाटोळे, हर्षल पारखे, ओमसाई कंकाळ, साई सोडणार या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

या विद्यार्थ्यांना सुनिता संसारे, रेखा खैरनार व आसावरी खोपे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस, संस्थेचे सचिव फादर रिचर्ड डिसिल्वा, व्यवस्थापक फादर मॅवरॉन फर्नांडिस, डॉन बॉस्को इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक फादर रिचर्ड बुरखाव, फादर शेल्डन डायस, समन्वय फ्रान्सिस पाटोळे व डॉ. शितल कोतकर यांनी अभिनंदन केले.




हनुमान जयंतीनिमित्त माळीवाडा येथील श्री शनी–मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे महंत संगमनाथ महाराज देवस्थानचे सचिव अशोक कानडे, विश्वस्त विजय कोथिंबीरे, अनंत पांडे आदिंसह भाविक उपस्थित होते.

# माळीवाडा येथील शनी मारुती मंदिरात विशेष महापुजा

नगर – माळीवाडा येथील शनी–मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी देवस्थानचे सचिव अशोक कानडे, विश्वस्त विजय कोथिंबीरे, अनंत पांडे आदिंसह भाविक उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह सजावट करण्यात आली होती.

## नगर शहरात विविध ठिकाणी ‘बजरंग बली की जय’

शहरामध्ये विविध मंडळांनी हनुमान जयंतीनिमित्त विविध मंडळांनी आकर्षक अशा मुर्ती उभारुन जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच शहरातील विविध तालिमीमध्ये आकर्षक रोषणाई करुन युवकांनी कावडीने आणलेल्या पाण्याने अभिषेक करण्यात आले. नगर शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, गणपतीची तालीम, कोठीची तालीम, नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगांव रोड, रेल्वेस्टेशन, केडगांव, एकनाथनगर, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. रुईच्या पानांचा हार, मंदिराबाहेर नारळ, टरबुज–खरबुजाचा प्रसादाचे आयोजन करण्यात होते.

कोठीची तालिम, नानापाटील वस्ताद, वाडिया पार्क तालिम, गणपतीची तालिम, सातपुते तालिम, झारेकरगल्ली आदिं ठिकाणीची तालमींवर रोषणाई करुन सजावट करण्यात आली होती.

हनुमान जयंतीनिमित्त गेल्या अनेक दिवसांपासून अहिल्यानगर शहरात चौका–चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ, मंगल भक्त सेवा मंडळ, श्री सकट मोचन हनुमान मंडळ आदि मंडळाने शहरात व उपनगरात हनुमान चालिसाचे पठण करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

वरदवीर हनुमान सत्संग मंडळ यांचे वतीने माळीवाडा शनी–मारुती मंदिर येथे पहाटे हनुमान चालिसाचे आयोजन करण्यात आले होते.

# शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली

## गणेश कवडे यांचे प्रतिपादन, नाना पाटील वस्ताद तालीम च्या वतीने हनुमान जयंती साजरी



हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने जलअभिषेक करण्यात आला.

नगर – शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली होय. प्रभु रामचंद्रांची नि:स्सीम भक्ती करुन निष्ठा कशी असावी भगवंत हनुमानांनी आपल्या सेवेतून दाखवून दिले आहे. हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकृत करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन नगरसेवक गणेश कवडे यांनी केले.

हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने जलअभिषेक करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक गणेश कवडे, पै. मन्नी शिंदे, अनिल कवडे, बजरंग महाराज शेळके, राधेशाम धूत, अमर शिंदे, ओंकार कवडे, सुनील कवडे, शिवाजी गुंजाळ, अभिषेक शेळके, शिवकुमार शेळके, अनिरुद्ध कवडे, शैलेश काळे, निलेश काळे, सचिन वामन, नितीन रोहकले, योगीराज वामन, धीरज रोहकले, दत्ता ढाकणे, राजू म्हस्के, बाळू दिवेकर, अतुल वाकचौरे आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना गणेश कवडे म्हणाले, हनुमान जयंतीची नालेगांवची मोठी परंपरा आहे. दरवर्षी नालेगांव येथील नाना पाटील वस्ताद तालिम येथील युवकांनी सालाबाद प्रमाणे प्रवरासंगम येथून कावडीने पाणी आणून जलाभिषेक केला जातो. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री हनुमानाची उपासना करुन अनेक कुस्तीची मैदानी गाजवली आहेत.

यावेळी नाना पाटील वस्ताद तालिम येथे आकर्षक सजावट करण्यात आली होती.



## भिंगार येथील जय बजरंग आखाडा बाजार तालीममध्ये श्री हनुमान जन्मोत्सव

भिंगारची ऐतिहासिक असणारी जय बजरंग आखाडा बाजार या तालमीने श्री हनुमान जन्मोत्सावानिमित्त सालाबाद प्रमाणे याही वर्षी तालमीध्ये सजावट करुन व लालमातीच्या हौदा मध्ये आकर्षक महादेवाची पिंड तयार केली होती. या कार्यक्रमास अविनाश (बंडु) बेद्रे, राहुल द्वारके, प्रतिक भंडारी, मुकुद भांड, चंद्रकांत धिवर, सोमा गरड, अनिल आवटी, ओम चव्हाण, रोहीत तारळकर, यश साळी, अजय घडसिंग, षियुश तेलुगंर, साई लोखंडे, केतन बाबासाहेब कजबे, सार्थक पाखरे, भूषण धिवर, मयुर धामोरे उपस्थित होते.

# नालेगाव येथे हनुमान जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक, टाळ–मृदंगाच्या गजरात परिसर दुमदुमला, गवळणी, अभंग व फुगडीच्या रिंगणात भक्तिमय जल्लोष; रांगोळी व फुलांच्या सजावटीने रस्ते फुलले



नालेगाव येथील गाडगीळ पटांगण परिसरात हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ व श्री पावन हनुमान व्यायामशाळा यांच्या वतीने पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. (छाया : लहू दळवी)

नगर – नालेगाव येथील गाडगीळ पटांगण परिसरात हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ व श्री पावन हनुमान व्यायामशाळा यांच्या वतीने पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. टाळ–मृदंगाच्या गजरात, श्री हनुमानाचा विजय असो अशा जयघोषांनी संपूर्ण नालेगाव परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. या पालखी मिरवणुकीत भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. गवळणी व अभंगांच्या तालावर फुगडीचे रिंगण रंगले आणि पारंपरिक वारकरी संस्कृतीचा सुंदर आविष्कार पाहायला मिळाला. रस्त्यांवर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती तसेच फुलांच्या सजावटीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. या सोहळ्यात गायक राजू भोईटे, प्रकाश झाडे, नामदेव तुळशे, राधाकिसन झाडे यांच्या मधुर आवाजाने भक्तिगीतांची मैफल रंगली. पखवाज वादनात आदिनाथ ढोले यांनी आपल्या कलेचा उत्कृष्ट आविष्कार सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि उत्साह यांचे सुंदर मिश्रण अनुभवायला मिळाले.

यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रेय मुदगल म्हणाले की, नालेगाव गाडगीळ पटांगण येथील श्री पावन हनुमान मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे दरवर्षी हनुमान जयंतीनिमित्त सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गेल्या ३४ वर्षांची ही परंपरा अखंडपणे सुरू असून या माध्यमातून वारकरी संप्रदायाला चालना मिळत आहे.

वारकरी संप्रदाय हा युवा पिढीला प्रेरणा, ऊर्जा आणि संस्कार देणारा असून अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात एकोपा व भक्तीभाव वाढीस लागतो. हनुमान जयंतीनिमित्त आयोजित पालखी मिरवणुकीत दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविक सहभागी झाले होते, असे त्यांनी सांगितले.

# ध्यान–अभ्यासात परिश्रम केल्याशिवाय उच्च आध्यात्मिक अवस्था प्राप्त होत नाही

## संत राजिंदर सिंहजी महाराज प्रतिपादन, हजारो भाविकांच्या उपस्थितीत अहिल्यानगरमध्ये सत्संगाची भक्तिपूर्ण वातावरणात सांगता



अध्यात्मिक गुरु राजिंदर सिंहजी महाराज यांनी अहिल्यानगर मधील सत्संगाच्या दुसऱ्या दिवशी उपस्थित हजारो भाविकांना मार्गदर्शन केले.

नगर – आपण सर्वसाधारणपणे ऐकलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवतो, परंतु पूर्ण गुरु हा स्वतः च्या अनुभवानुसार सत्याचा मार्ग दाखवतो. जेव्हा मनुष्य आपल्या इच्छा नियंत्रणात ठेवतो, तेव्हा त्याचे मन परमेश्वराकडे वळते आणि त्याला आपल्या अंतरात अनहद नाद व दिव्य संगीताचा अनुभव येऊ लागतो. या अनुभवाला विविध संतांनी शब्द, कलमा, वर्ड आणि बांगे–आसमानी अशा विविध नावांनी संबोधले आहे. जेव्हा साधक आपल्या अंतर्मनात परमेश्वराचा शब्द ऐकतो, तेव्हा त्याचा आत्मा उच्च आध्यात्मिक स्तरांकडे झेप घेते आणि त्याला स्वतःची ओळख होते की तो परमेश्वराचाच अंश आहे. मन:शांती करून परमेश्वराच्या प्राप्तीसाठी अध्यात्माच्याच मार्गावर जावे लागते. ध्यान–अभ्यासात परिश्रम केल्याशिवाय उच्च आध्यात्मिक अवस्था प्राप्त होत नाही, असे मार्गदर्शन संत राजिंदर सिंहजी महाराज यांनी केले.

आध्यात्मिक गुरु तसेच सावन कृपाल रूहानी मिशनचे प्रमुख राजिंदर सिंहजी महाराज यांचा अहिल्यानगरमध्ये सत्संगाचा कार्यक्रमा १ एप्रिल रोजी सायंकाळी झाला. यासाठी मिस्कीननगर येथे हजारो भाविकांनी उत्साहाने उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सुरुवात माता रीटाजी यांनी सत्संगात संत दादू साहेब लिखित दादू देखा दीदा, सब कोई कहत सुनीदा या भजनाच्या सादरीकरणाने केली. या भजनाचे स्पष्टीकरण संत राजिंदर सिंहजी महाराज यांनी आपल्या प्रवचनातून केले. दोन दिवस चालेल्या या दर्शन व प्रवचन सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी अहिल्यानगर केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी व भाविकांनी अप्रीश्रम घेतले. प्रवचना नंतर राजिंदरसिंह महाराजांनी भाविकांमध्ये जाऊन सर्वांना दर्शन व आशीर्वाद दिले.

संत राजिंदर सिंहजी महाराज यांनी उदाहरण देत सांगितले की, जसे दूधाचे दही व त्याच्या लोण्याचे जोवर मंथन केले जात नाही, तोपर्यंत त्यातून तूप मिळत नाही; त्याचप्रमाणे जीवनात परिश्रम केल्यानंतरच यश व परमेश्वराची प्राप्ती होते. सुरत–शब्द योग हा सर्वांत श्रेष्ठ मार्ग आहे. या मार्गासाठी कोणत्याही कठीण साधना किंवा योगमुद्रांची आवश्यकता नसते. एकदा हा अभ्यास केल्यास साधकाला आपल्या अंतरात परमेश्वराचा अनुभव येतो आणि मानवजन्माचा खरा उद्देश पूर्ण होतो.

सत्संगानंतर संत राजिंदर सिंहजी महाराज यांनी नवीन साधकांना आध्यात्मिक दीक्षा देऊन त्यांना प्रभूच्या ज्योती व श्रुतीचा अनुभव करून दिला. सावन कृपाल आश्रमाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष महेश अंबवानी यांनी आभार मानताना महाराजांच्या प्रती आदरभाव व्यक्त करून कृतज्ञता व्यक्त केली.

# नगरमध्ये ३ एप्रिलला राधाकृष्ण महाराजांचा ‘श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञा’चा शुभारंभ



### उत्साहपूर्ण वातावरणात जय्यत तयारी पूर्ण


नगर – येथील श्री रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवाराने नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ ३ एप्रिलपासून भक्तीपूर्ण वातावरणात करण्यात येणार आहे. ९ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत जोधपूरनिवासी गोवत्स श्री राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीतून श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचे भाग्य नगरकरांना लाभणार आहे.

या ज्ञानयज्ञ सोहळ्याची नियोजन बैठक नुकतीच पटेलवाडी मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. बैठकीस शहरातील वैष्णव समाजातील भाविक मंडळी उपस्थित होती. दीपप्रज्वलनाने बैठकीचा श्रीगणेशा करण्यात आला. शरद झंवर यांनी प्रास्ताविक केले. कल्पेश इंदानी व महेश इंदानी यांनी कथेच्या आयोजना संदर्भात माहिती दिली. रामेश्वर बिहाणी व बजरंग दरक यांनी प्रचार, प्रसार संदर्भात मार्गदर्शन केले.

बैठकीस श्रीगोपाल धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, राजेंद्र चोपडा, रामनिवास इंदानी, मगनभाई पटेल, प्रदीप पंजाबी आदी उपस्थित होते. यांनी उपयुक्त सुचना केल्या.

संपूर्ण वैष्णव समाज आणि नगरकरांसाठी इंदानी परिवाराने या कथा श्रवणाचा अमृत योग घडवून आणल्याबद्दल उपस्थित सर्वांनी इंदानी परिवाराचे अभिनंदन केले. कथा स्थळी उत्तम बैठक व्यवस्था करण्यात आली असून शुध्द पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली आहे.

या कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शहरासह उपनगरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इंदाणी परिवाराने आणि संपूर्ण वैष्णव समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.




लक्ष्मीकारंजा परिसरातील श्री संकटमोचन मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# लक्ष्मीकारंजा येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात

नगर – शहरातील लक्ष्मीकारंजा परिसरातील श्री संकटमोचन मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात झाला. पहाटे ५:४० वाजता पार पडलेल्या श्री मारुती जन्मोत्सव सोहळ्याने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. दिवसभर भाविकांना टरबूज व खरबूजाचे वाटप करण्यात आले. यंदाच्या उत्सवातील विशेष आकर्षण ठरलेला महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला. सकाळी ११:३० वाजता महाआरतीनंतर महाप्रसादाचे वितरण सुरू झाले. या वेळी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यंदा महाप्रसादामध्ये सार–भात व लापशीचा समावेश करण्यात आला होता. सुयोग्य नियोजनामुळे भाविकांना कोणतीही अडचण न होता महाप्रसादाचा लाभ घेता आला.

उत्सवानिमित्त हनुमान चालीसा पठण व भजन संस्थेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांमध्ये भाविक सहभागी झाले होते व सामूहिक पठण आणि भजनातून भक्तिरसाचा अनुभव घेतला.

या उत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरालाही प्रतिसाद मिळाला. अष्टविनायक ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात ६५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

# महावीर जन्म कल्याणकच्या पावन दिनी हजारो बांधवांनी घेतली स्त्री जन्माच्या स्वागताची शपथ : जैन महिला कॉनफरन्सचा उपक्रम



अ.भा. जैन महिला कॉनफरन्सच्या पुढाकाराने महावीर जन्म कल्याणकच्या पावन दिनी स्त्री जन्माच्या स्वागताची शपथ घेताना जैन समाज बांधव.

नगर – महावीर स्वामींनी सत्य, अहिंसा, अपरिग्रह हा महत्वपूर्ण संदेश दिला. त्यांच्या जन्म कल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने अ.भा. जैन महिला कॉनफरन्सच्या राष्ट्रीय अध्यक्षा संतोष जैन आणि राष्ट्रीय महामंत्री रीचा जैन यांच्या नेतृत्वाखाली तसेच बेटी बचाव चळवळीच्या आद्यप्रवर्तक डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील प्रत्येक शाखेत ठिक ठिकाणी बेटी बचाव बाबत ठराव घेतला गेला व स्त्री जन्माच्या स्वागताची शपथ घेण्यात आली. यामध्ये हजारो बंधू भगिनी सहभागी झाले अशी माहिती चतुर्थ झोनच्या प्रांतीय महिला अध्यक्षा सौ. ज्योती नवनीत गांधी यांनी दिली.

अभियानाचा शुभारंभ अहिल्यानगर येथील आनंदधाम–धार्मिक परीक्षा बोर्ड येथे झाला. याप्रसंगी मनिषा मुनोत यांनी ठरावा बद्दलची सुचना मांडली. डॉ. सुधा कांकरिया यांनी ठरावाचे वाचन केले, सौ. ज्योती गांधी यांनी हजारोंच्या उपस्थितीत ठराव मंजूर करून घेतला. ‘आम्ही स्त्रीभ्रुणहत्या करणार नाही, करू देणार नाही, आम्ही स्त्री जन्माचे स्वागत करू. तिला शिकवून तिच्या पायावर उभे करू’ असा ठरावाचा मजकूर होता.

याप्रसंगी डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की वाढत्या स्त्रीभ्रुणहत्येमुळे मुलींची संख्या रोडावली आहे. मुला मुलींच्या संख्येत मोठी तफावत झाली आहे. समाजाची घडी विस्कटली आहे, स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे, आपण वेळीच सावध होऊन स्त्री जन्माचे स्वागत केले नाही तर हे जग संपायला वेळ लागणार नाही, जगात वाढत चाललेली हिंसा थांबविण्यासाठी अहिंसा तत्वाचे पालन करणे महत्वाचे आहे. जगा व जगु दया हा संदेश आपल्या आचरणातुन प्रगट होणे आवश्यक आहे. महावीर भगवान यांच्या अहिंसा संदेशाचे पालन करणे म्हणजेच महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा करणे होय.

आदर्शऋषिजी म.सा. म्हणाले की, कुटुंबामध्ये मुला व मुलींना समान वागणुक देणे आवश्यक आहे. दोघांवरही उचीत संस्कार झाले पाहिजेत. मुलींवर बंधने घालुन मुलांना वाऱ्यावर सोडणे योग्य नाही. स्त्री पुरुष समानता कुटुंबातुन दिसली पाहिजे.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा. आलोकऋषिजी म.सा., महासती सत्यप्रभाजी म.सा, अर्चनाजी म.सा, दिव्यदर्शनाजी म. सा, विश्वदर्शनाजी म. सा सहित अनेक साधु संत उपस्थित होते. सर्व साधुसंताच्या आशिर्वादामुळे या सभेला विशेष महत्व प्राप्त झाले. श्रीमती मंगल मुथ्था यांनी आभार मानले. याप्रसंगी कल्पना चोरडिया, लता गांधी, उज्वला लोढा, सुवर्णा बंबोरी, हेमा लुणिया उपस्थित होते.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



**जो मातृभूमीवर प्रेम करीत नाही, त्याला कशावरच प्रेम करता येणार नाही**

## दिनविशेष ०३ एप्रिल

१७८१ : स्वामीनारायणफ हिंदू धर्माच्या स्वामीनारायण संप्रदाय संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: १ जून १८३०)

१८८२ : नाथमाधव सामाजिक ऐतिहासिक कादंबरीकार यांचा जन्म. (मृत्यू: २१ जून १९२८)

१८९८ : हेन्री लुस टाईम मॅगझिन चे सहसंस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६७)

१९०३ : कमलादेवी चट्टोपाध्यायफ मॅगसेसे पुरस्कार विजेत्या स्वातंत्र्यसैनिक यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९८८)

१९०४: रामनाथ गोएंका इन्डियन एक्सप्रेस वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑक्टोबर १९९१)

१९१४ : सॅम माणेकशा फील्ड मार्शल यांचा जन्म. (मृत्यू: २७ जून २००८)

१९३० : हेल्मुट कोल्ह जर्मन चॅन्सेलर यांचा जन्म.

१९३४ : जेन गुडॉल इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ यांचा जन्म.

१९४२ : आदि गोदरेज भारतातील प्रसिद्ध उद्योगपति आणि प्रसिद्ध औद्योगिक घराने गोदरेज समूह उद्योगाचे अध्यक्ष यांचा जन्म.

१९४९ : रामा नारायणन भारतीय दिग्दर्शक व निर्माते यांचा जन्म.

१९५५ : हरिहरन सुप्रसिद्ध गायक यांचा जन्म.

१९६२ : जयाप्रदा चित्रपट अभिनेत्री आणि संसद सदस्य यांचा जन्म.

१९६५ : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०००)

१९७३ : निलेश कुलकर्णी भारतीय क्रिकेट खेळाडू यांचा जन्म.

मृत्यू :१६८० : छत्रपती शिवाजी महाराज यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १६३०)

१८९१ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती यांचे निधन. (जन्म: ४ एप्रिल १८४२)

१९८१ : जुआन त्रिप्पफ पॅन अमेरिकन वर्ल्ड एरलाईन्स चे स्थापक यांचे निधन.(जन्म: २७ जून १८९९)

१९८५ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशीफ महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक यांचे निधन. (जन्म: १३ मार्च १८९३)


१९९८ : मेरी कार्टराइट इंग्लिश गणितज्ञ यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९००)

१९९८ : हरकिसन मेहता प्रसिद्ध गुजराती कादंबरीकार यांचे निधन.

२०१२ : गोविंद नारायण भारतीय राजकारणी यांचे निधन.

उन्हाळ्यात मोसंबीचा रस हे एक उत्तम पेय आहे. मोसंबीच्या रसात साखर घालून तिचे सरबत बनविता येते. या सरबतामुळे उन्हाळ्यात जीवाला शीतलता प्राप्त होते. ताकद येते. रोज मोसंबीचा रस घेतल्यास कांती तेजस्वी होते. कारण रक्तदोष घालविण्याचे सामर्थ्य मोसंबीत आहे. म्हणूनच डॉक्टर आजारपणात विशेषतः तापात मोसंबीचा रस घेण्यास आग्रहाने सांगतात. **मोसंबी**

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) तीर्थस्थळी वाटतात तो गोड पदार्थ
४) दूरदर्शन ८) शिवाजी
१०) वस्तरा ११) गाढव
१२) शेतातील गवत
१४) प्रत्येक, शंकर
१५) मोदक, पोळी इ.च्या आत सारण भरलेले असतात ते १६) उत्तराधिकारी
१८) निद्रा घेणे
२०) कढण्यासाठी ठेविलेला पदार्थ
२१) भुलविणारा
२३) कुटी
२४) साप करणे, धान्य स्वच्छ करणे
२६) प्राणावरच्या संकटात अविचाराने शिरकाव
२७) पोलिसी शिक्षण
२९) मृत्यू ३०) हत्ती
३२) मृदू, नरम
३३) तीन चतुर्थांश
३४) एक टोकदार शस्त्र
३५) साने गुरुजीचे जन्मगाव
३७) ही पातळ होणे म्हणजे धैर्य सुटणे
३८) बेचव, अळणी
४१) एक शस्त्र
४२) साधु, ऋषी
४३) छंदशास्त्रातील एका वृत्ताचे नाव
४५) पायदळातील मुख्य
४६) दहाव्या ठिकाणचा
४७) कडे, वर्तुळ ४८) फूल
४९) पत्नी ५१) धोंड, अडचण
५२) वेळूची पट्टी
५३) खिसा कापणे

### उभे संकेत

१) वाहते पाणी
२) सकाळची गोड झोप
३) छिद्र, प्रत्येक४) फार तापलेले
५) मोदक, पोळी इ.च्या आत हे भरले असते.
६) एक प्रकारचे भांडे
७) भयंकर उष्णता
९) मशागत, वाहून नेणारा
१३) चांगले वर्तन
१५) महाराष्ट्रातील एक जिल्हा
१७) विशिष्ट द्रव्यसंख्या
१९) नापीक जमीन२०)दु:खाची वेदना
२२) वारांगणा २३) बेबंदशाही
२४) घुंगरु, नुपूर२५)फारशी भाषेत समाप्त
२६) प्राण जाताना होणाऱ्या वेदना
२८) लवकर न तुटणारा
२९) नरम ३१) पाणी
३३) बल्लाळेश्वर गणपती येथे आहे
३६) जहर ३८) कार्य करणारे
३९) वाहीत नसलेली जमीन
४०) बाजारबुणगे ४१) दांडू
४२) अरबी भाषेनुसार वसुलीचे काम करणारा ४४) गणपती
४६) ना उष्ण ना थंड
४७) लांबी रुंदी व जाडी असलेला तुकडा ४८) कोरडी ५०) एक आडनाव

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | या | स | | का | ग | दी | घो | डे | ना | च | वि | णे |
| मा | ता | म | ह | | | न | | ग | ड | को | न | |
| द | या | वा | न | | स | बं | ध | | क | र | व | त |
| | त | य | | धा | म | धु | म | | र्णि | | णी | |
| पी | | | लो | क | र | | ध | ड | | सो | | क |
| ह | जा | र | | द | | कु | मा | र | सा | नु | | ळ |
| ळ | | ज | न | प | द | | | का | | नि | वा | स |
| द | श | क | | ट | | का | ज | ळी | | ग | | |
| हो | | | वि | शा | ल | | न | | आ | म | र | स्ता |
| गो | रा | पा | न | | | को | क | रु | | | स | |
| री | | न | य | न | बे | टी | | प | र | वा | ना | |
| | स | द्दा | शी | व | | | पा | व | सा | ळा | | च |
| | | न | ल | | धु | पा | र | ती | | | न | क्र |




१) सर जॉन लॉरेन्स प्रान्तामध्ये कालवे पाटबंधारे तयार करण्यासाठी कोणत्या विभागाची स्थापना केली?
अ)पाटबंधारे ब)कोल्हापुरी बंधारे क)लोककर्म विभाग ड)पाटबंधारे विभाग

२) कोणाला महाभियोगाच्याद्वारे अधिकार पदावरुन दुर केले जाऊ शकते?
अ)सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ब)पंतप्रधान क)राष्ट्रपती ड)राज्यपाल

३) स्वामी दयानंद सरस्वती यांनी आपले विचार कोणात्या ग्रंथात मांडले?
अ)हिंदुस्थान का धर्म ब)तेजोमय ज्ञान क)सत्य ड) सत्यार्थ प्रकाश

४) लोकजागृती, लोकसंग्रह व लोकसंघटना यांचे महत्त्व खालीलपैकी कोणत्या विचारसरणीने स्वीकारले?
अ)जहाल ब)क्रांतीकारी क)मवाळ ड)अहिंसक

५) प्रोटीन्स कशापासून तयार झालेले असतात?
अ)ऊसापासून ब)ॲमिनो ॲसिडपासून
क)फॅटी ॲसिडपासून ड)न्यूक्लीईक ॲसिडपासून

६) गाळाच्या जमीनीत ..... व चुन्याचे प्रमाण अधिक असते?
अ)स्फुरद ब)सेंद्रीय क)नत्र ड)पोटॅश

७) ऑक्सीजनमध्ये अमोनिया वायू कोणत्या ज्योतीने जळतो?
अ)हिरवा ब)लाल क)पिवळसर ड)काळा

८) ..... या प्राण्यात श्वसनासाठी त्वचेचा उपयोग केला जातो?
अ)साप ब)बेडूक क)पाल ड)सरडा

९) जनावरांना होणाऱ्या सांसर्गीक रोगामध्ये पुढीलपैकी कोणता रोग महत्त्वाचा आहे?
अ)जोन्स ब)तिवा क)बुळकांड्या ड)हगवन

१०) पृथ्वीच्या पृष्ठभागापासून किती कि.मी. अंतरावर सूर्यकिरणामुळे ऑक्सिजनचे ओझोनमध्ये रुपांतर होते?
अ)५ कि.मी. ब)२२ कि.मी. क)१६ कि.मी. ड)२१कि.मी.

११) गलगंड आजार झाल्यास शरिरात कोणत्या संप्रेरकाची निर्मिती कमी होते? अ)थॉंबिन ब)ॲड्रेनॅलिन क)पॅराथ्रोमीन ड)थायरॉक्झीन

१२) स्फटीकरुप कॅल्शीयम सल्फेटला उष्णता दिल्यास कोणता पदार्थ मिळतो?
अ)तुरटी ब)प्लॅस्टीक ऑफ पॅरिस क)फेरस सल्फेट ड)युरिया

१३)हरितक्रांती खालीलपैकी कोणत्याप्रकारच्या पिकाशी निगडीत आहे?
अ)अन्न धान्य उत्पादन ब)उस उत्पादन
क)दुध उत्पादन ड)तंतू उत्पादन

१४) शरिरात ऊर्जा निर्माण होते कारण ....?
अ)एझामद्वारा ग्लुकोजचे क्रमीक विघटन
ब) ऑक्सीजनचे उर्तीमधील स्थानांतरण
क)एन्झाममुक्त झाल्यामुळे ड) हार्मोन्स मुक्त झाल्यामुळे

१५)बुलेटप्रुट जॅकेटला भेदून जाणाऱ्या गोळ्यांना कोणते आवरण बसविलेले असते?अ)निकेलब)टॅपकॉन क)सिल्व्हर ड) कॉपर

१६) धोतऱ्याच्या पानांना खालीलपैकी काय नसतात?
अ) मुख्य शीरा ब)पर्नवृंत क)पर्नपाते ड)उपपर्ने

१७) परागकोषात काय असतात?
अ) स्त्रीकेसर ब)कुक्षीवृत्त क)पुंकेसर ड)परागकण

१८) तापमानातील फरकांमुळे निर्माण होणाऱ्या हवेच्या हालचालींना काय म्हणतात?अ)व्यापारी वारे ब)वारे क)वादळड) अभिसरण प्रवाह

**उत्तर: (१-क), (२-अ), (३-ड), (४-अ), (५-ब), (६-ड),(७-क), (८-ब), (९-क), (१०-क), (११-ड), (१२-ब), (१३-अ),(१४-अ), (१५-अ), (१६-ब),(१७-ड),(१८-ड).**

## विनोद



मुलगा- आई, घरी जेवढे लोक शेतात त्या सर्वांना मला काका महणायला सांगतेस
आई- होय बाळ। काका म्हणायलाच हवे.
मुलगा-पण ते सारे काकाच आहेत का?
आई- होय बाळ।
मुलगा- आई, तू ना फारच कंजूष आहेस काका तर ढीगभर आहेत. पण बाबा मात्र एकच आहेत.

-----------------------


वडील कामावरून आल्याबरोबर राजू त्यांना बिलगला व म्हणाला, 'बाबा, आज आई ना तुम्हाला शिव्या देत होती।'
वडील- काय, मला?
राजू- होय, ती मला गाढवाच्या लेका... पोरा असे म्हणाली.


## चिंतन

### आळसे कार्यभाग नासतो

उद्याचे काम आजच करा व आजचे काम आत्ताच करा. आपल्या कामात करू, होईल असे म्हणून चालढकल करतो. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावर ही म्हण आळशी माणसाची प्रवृत्ती दर्शविते. एकाच वर्गात शिकणारे विद्यार्थी, त्यांना शिकविणारे शिक्षक एकच पण सर्वांचाच काही पहिला नंबर येत नाही. आळस न करता अभ्यास करतात तेच पुढे जातात. आळस झटकून कर्तबगारी दाखविणे माणसाच्याच हातात असते.

## फिल्मी शब्दकोडे



### आडवे संकेत

१) सन २००३ मध्ये आलेल्या तेरे नाम चित्रपटाचे दिग्दर्शक.
४) अमिताभ बच्चन, नंदीता दास आणि मनोज वाजपेयीचा चित्रपट.
५) बॉबी देओल, अमिषा पटेल आणि अक्षय खन्नाचा चित्रपट.
८) सन १९८९ मध्ये राजकुमार दिग्दर्शीत या चित्रपटात मिथून चक्रवर्ती, डिम्पल कपाडिया, मिनाक्षी शेषांद्री होते.
१०) सन १९८६ मध्ये हरमेश मल्होत्रा दिग्दर्शीत या चित्रपटात ऋषी कपूर आणि श्रीदेवी होते.
११) आपके प्यार में हम सवरने लगे.... या गाण्याचा चित्रपट.
१३) अमिताभ बच्चन, अजय देवगन, सोनाली बेंद्रेचा चित्रपट.
१५) सुनील शेट्टी आणि करिश्मा कपूरचा चित्रपट.
१७) सन १९९१ मध्ये आलेला पुजा भट्टचा पहिला चित्रपट होता.
१८) धडक्न चित्रपटामध्ये सुनील शेट्टीचे नाव.
२०) शिवदासानी (नायक)
२२) रोटी कपडा और
२३) टि. रामाराव दिग्दर्शीत या चित्रपटात गोविंदा, करिश्मा कपूर आणि आदित्य पांचोली होते.
२५) जैकी श्रॉफ, अनिल कपूर आणि शाहरुख खानचा चित्रपट.
२६) सन १९८४ मध्ये पि. श्रीनिवासराव दिग्दर्शीत या चित्रपटात रजनीकांत आणि श्रीदेवी होते.
२९) सन १९९३ मध्ये भरत रंगाचारी दिग्दर्शीत या चित्रपटात अक्षय कुमार, आयशा जुल्का आणि सुनील शेट्टी, ममता कुलकर्णी होते.

### उभे संकेत

२) सन १९८४ मध्ये प्रकाश मेहरा दिग्दर्शीत या चित्रपटात जयाप्रदा आणि अमिताभ बच्चन होते.
३) कुमार गौरव, संजय दत्त, पुनम ढिल्लो आणि अमृता सिंहचा चित्रपट.
४) अक्षय कुमार, बिपाशा बासू, बॉबी देओल, करिना कपूरचा चित्रपट.
५) सन २००० मध्ये मनोज अग्रवाल दिग्दर्शीत या चित्रपटात गोविंदा आणि राणी मुखर्जी होते.
६) डेविड धवन दिग्दर्शीत या चित्रपटामध्ये ऋषी कपूर, जुही चावला आणि विनोद खन्ना होते.
७) महेज मांजरेकर दिग्दर्शीत या चित्रपटात अजय देवगन आणि सोनाली बेंद्रे होते.
९) सन १९९२ मध्ये अजय कश्यप दिग्दर्शीत या चित्रपटामध्ये संजय दत्त आणि निलम होते.
१२) मुजरिम (चित्रपट)
१४) बॉक्सर चित्रपटामध्ये मिथून चक्रवर्तीची नायीका.
१६) एका गायीकेचे नाव.
१९) सन २००१ मध्ये आलेला जुही चावला आणि शाहरुख खानचा चित्रपट.
२१) लौट चले (चित्रपट)
२४) सलाम (चित्रपट)
२५) राजीव राय दिग्दर्शीत या चित्रपटामध्ये नसरुद्दीन शाह, सनी देओल आणि जैकी श्रॉफ होते.
२६) सन १९९९ मध्ये आलेल्या या चित्रपटामध्ये अक्षय कुमार, ट्विंकल खन्ना होते.
२७) सन २००० मध्ये संजय गुप्ता दिग्दर्शीत या चित्रपटामध्ये संजय दत्त, शिल्पा शेट्टी, जैकी श्रॉफ, रविना टंडन होते.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | वे | क | ओ | बे | रॉ | य | | ग | | | प | |
| | | री | | | | स | | द | ल | प | ती | |
| न | गी | ना | | ग | | बॉ | र्ड | र | | ल्ल | | फ्र |
| म्र | | क | | ज | | स | | | र | वी | | स |
| ता | | पु | र | ब | | | | त | | जो | शि | ले |
| शि | | र | | त | | मो | ह | न | जो | शी | | |
| रो | ड | | हे | मा | | ह | | ब | | | बा | सू |
| ड | | आ | | शा | | ब्ब | | द | स्त | क | | नी |
| क | बी | र | | | | ते | | न | | | मे | ल |
| र | | या | | | | | | | सं | | | द |
| | पा | पा | क | ह | ते | है | | सं | ज | य | द | त्त |
| | | र | | | जो | | ऋ | | य | | ला | |
| छु | पा | | न | सी | ब | | षी | | | स | ल | मा |

## चारोळी

माझ्यासाठी सख्या रे
तु ही सारखा तरसतो
मी आली म्हणजे
पावसासारखा बरसतो

## पाक कला

**मोडवलेल्या मुगाचे पराठे**

साहित्य- बाहेरील आवरण्यासाठी कणीक-दोन वाट्या, बसेन, एक वाटी, मीठ तेल.

कृती- प्रथम बाहेरील आवरणाचे साहित्य एकत्र करून, कणकेचा गोळा भिजवून, झाकून ठेवावा. पळीभर तेलात मिरच्या हिंग, मोहरी हळद टाका. त्यात निवडून, धुऊन, पूर्णत: निथळलेले मूग टाका. जरा परता त्यानंतर आच मंद करा. मुगावर झाकण घाला, मूग मऊ पण एकदम कोरडे शिजवा. मीठ घाला. मूग जरा शिजले की आच काढा. निंबू द्या, मग मिक्सरमधून काढा. त्यात कोथिंबीर घाला, वरून लिंबू पिळा, कालवा. पुरणपोळीत सारण भरतो, त्याप्रमाणे सारण (मुगाचे) भरून, तव्यावर तेल टाकून खमंग पराठे भाजा.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक **कै. मारुती नामदेव म्हस्के यांचे कायदेशीर वारस राजेंद्र मारुती म्हस्के, रा. करशेटजी रोड, अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखूष खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी साठेखतापोटी आमचे आशिलांकडून रक्कम घेतलेली असून सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरविले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीसपत्र, मनाई हुकूम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न वस्त्र, लिज इत्यादी अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणून दाखवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :**– मौजे अहिल्यानगर ता.जि.पो.तु.म.ना.पा. अहिल्यानगर हद्दीतील गावठाण सारामाफीने असलेली मिळकत याचा सि.स. नं.२१८५ब/१ चा म्यु. घर नं. २१०४ चे क्षेत्र ५४७.९६ चौ. मी. पैकी दक्षिण बाजूकडील पुर्व–पश्चिम १३० फुट व दक्षिण उत्तर १७ फुट स्वतंत्र भिंती असलेली पुर्वेस वाग आणि ओटा, पिछाडीला वागता दरवाजा (तपकिर गल्ली) पाणी पूर्वेला व पश्चिमेला जाते. सदर सिटी सर्व्हे नं.२१८५ब/१ चे जे क्षेत्र वारसा हक्काने विद्यमान मालकांच्या मालकीस १३० X १७ फुट आलेले आहे.

**यांसी चतुः सिमा**

पुर्वेस : रस्ता, दक्षिणेस : सि.स.नं. ४१८६,
पश्चिमेस : बोळ / रस्ता, उत्तरेस : सि. स.नं. २१८५ब पैकी उर्वरीत हिस्सा.
येणे प्रमाणे चतु : सिमापुर्वक तदंगभुत वस्तुसह जाणे–येणे हक्क मालकी कब्जा, वागवहिवाटीसह काहीएक राखून न ठेवता येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक :– ०२/०४/२०२६
अहमदनगर

**अॅड.विजय बी.मुनोत,** बी.कॉम,एलएल.बी.
बारा तोटी कारंजा, माळीवाडा,अहमदनगर, मो : ९८५०८७३१५३

# एमडी अपहार प्रकरणात पोलीस निरीक्षकास निलंबित करून सहआरोपी करण्यात यावे

### १५ एप्रिलपूर्वी कारवाई न झाल्यास उपोषणास बसणार

नगर – अहिल्यानगर पोलीस मुख्यालयातील अंमली पदार्थ साठवणूक केंद्रातून मोठ्या प्रमाणात एमडी (मेफेड्रोन) या अंमली पदार्थाच्या अपहार प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना निलंबित करून सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी शाकिर शेख यांनी राज्याचे गृहमंत्री यांच्याकडे केली आहे. तसेच १५ एप्रिलपर्यंत कारवाई न झाल्यास नाशिक येथील विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने १७ जानेवारी रोजी शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी शादाब शेख व शिंदे यांच्याकडून १ किलो ५२ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) जप्त केले होते. या तपासादरम्यान आरोपी महेश गायकवाड व ऋषिकेश चित्तर यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ९ किलो ६५५ ग्रॅम, अंदाजे २ कोटी १० लाख ४० हजार रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. एकूण जप्त माल १० किलो ९७५ ग्रॅम इतका होता.

तपासादरम्यान चित्तर याने हा एमडी ड्रग्ज अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचारी श्यामसुंदर गुजर याच्याकडून मिळाल्याची कबुली दिल्यानंतर, शिरूर पोलिसांनी २१ जानेवारी रोजी गुजर याला अटक केली. या प्रकरणात ४ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कालुबरमे यांच्या अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय समिती नेमण्यात आली. समितीच्या अहवालानुसार, जप्त १० किलो ९७५ ग्रॅम अंमली पदार्थाचा अपहार करून त्याऐवजी मैद्याच्या पिठाने भरलेल्या गोण्या ठेवण्यात आल्याचे उघड झाले. यानंतर पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी पीआय कबाडी यांच्याकडे दिली. कबाडी यांनी ७ फेब्रुवारी रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात श्यामसुंदर गुजर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

मात्र, शाकिर शेख यांनी आरोप केला आहे की, पीआय कबाडी यांना वाचवण्यासाठीच त्यांच्याकडे गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले अंमली पदार्थ साठवणूक केंद्राचे प्रभारी म्हणून त्या मालाच्या सुरक्षिततेची जबाबदारी कबाडी यांच्यावर असताना त्यांच्या कार्यकाळात इतक्या मोठ्या प्रमाणात अपहार होणे ही गंभीर बाब आहे. सीसीटीव्ही व्यवस्था, दुहेरी कुलूप प्रणाली व नियमित तपासणी या बाबींची अंमलबजावणी न झाल्यामुळेच हा प्रकार घडल्याचा आरोप शाकिर शेख यांनी केला आहे. तसेच, वरिष्ठ स्तरावर देखरेखीची जबाबदारी पार पडली नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दर तीन महिन्यांनी अंमली पदार्थ साठवणूक केंद्राची तपासणी करण्यासाठी निरीक्षण अधिकारी नेमणे आवश्यक असताना, तसे करण्यात आले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या संदर्भात आ. हेमंत ओगले यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करून कारवाईची मागणी केली होती. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

शाकिर शेख यांनी मुख्यमंत्री, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांच्याकडे निवेदन देऊन या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. १५ एप्रिलपूर्वी कारवाई न झाल्यास नाशिक येथील विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## : सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :

मे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.

### जाहीर समन्स

मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, दिल्लीगेट, अहिल्यानगर ता/जि. अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक २२/०१/२०२६ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक १०/०२/२०२६ व दिनांक ११/०३/२०२६ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक ११/०३/२०२६ व दिनांक २५/०३/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक ०८/०४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४, पहिला मजला.जीएस महानगर बँकेशेजारी, अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २९० ---- २०२६ | जाबदेणार १) सौ.प्रयागा उर्फ पद्मा अरुण दाते<br>राहणार :– ६७४२ लांडे गल्ली, नालेगाव अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री–शिवाजी लक्ष्मण गुंजाळ<br>राहणार:– घर नं – ८७, नालेगाव, नानापाटील तालिमजवळ,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. संतोष देवराम शिंदे.<br>राहणार:– घर नं– ८,आरोह कॉलनी,वाणीनगर,पाईपलाईनरोड,अ.नगर | ३७,६२६/– |
| २ | २९१ ---- २०२६ | जाबदेणार १)श्री. वडलाकोंडा अनिल आंबादास<br>राहणार :– बागडपट्टी,आशीर्वादवाड,महावीर बिल्डिंगसमोर ,अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री. बिमन ऋषिकेश मिनानाथ<br>राहणार:– मिसाळ गल्ली, तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३)श्री. मुदीगोंडा श्रीहरी नारायण<br>राहणार:– लेंडकरमळा,अहिल्यानगर. | ८१,९०५/– |
| ३ | २९२ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री. हुच्चे रामभाऊ महादु<br>राहणार :– लालटाकीसमोर गवळीवाडा,सिव्हिल हॉस्पिटल,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री. औरंगे प्रमोद मनोहर.<br>राहणार:– दत्त मुंजोबा मंदिराजवळ, भिंगार,पाटील गल्ली,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३)श्री. नागापुरे परशुराम दिगंबर.<br>राहणार :– सिव्हिल हॉस्पिटल, गवळीवाडा,अहिल्यानगर. | ४४,४२८/– |
| ४ | २९३ ---- २०२६ | जाबदेणार १ श्री.भिमनपेल्ली दिपक मधुकर<br>राहणार :– सी–४.नित्यसेवा सोसायटी,पाईपलाईनरोड,सावेडी, अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री.नामन गोविंदा विठ्ठल<br>राहणार :– नालेगाव,घर नं, ५८६०, देशमुखगल्ली,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री.जेटला प्रकाश शिवाजी<br>राहणार :– नालेगाव, बोरुडे बिल्डिंग सातपुते तालिममागे,अहिल्यानगर. | १६,४८०/– |
| ५ | २९५ ---- २०२६ | जाब देणार १) श्री.दत्तात्रय त्रिंबक बनकर<br>राहणार :– सातभाई गल्ली,दिल्लीगेट, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. शेखर बालय्या अबोल्लू<br>राहणार:– प्लॉट नं २६, भिस्तबाग नाका, सावेडी, अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. देशमुख अनिरुद्ध अरविंद<br>राहणार:– घर नं ४३, सातभाई मळा, दिल्लीगेट, अहिल्यानगर | १,४०,८४८/– |
| ६ | २९७ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री. हुच्चे दिपक नारायण<br>राहणार :– ५३ ब.म्युनिसिपल कॉलनी टीव्ही सेंटर रोड,अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री.पवार सचिन बब्रुवान.<br>राहणार :– राधामोहन कॉलनी, सह्याद्री पब्लिक स्कूलजवळ सावेडी,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री. किरण प्रकाश वेताळ.<br>राहणार:– राजसारथी तपोवन कॉलनी,सावेडी, निर्मलनगर रोड, अहिल्यानगर | ९३,९७५/– |
| ७ | २९८ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री. बाले सुरेश गंगाराम<br>राहणार :– बनेसाब पटांगण, अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) सौ. बाले कल्पना सुरेश.<br>राहणार:– ५२०, तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. निसळ प्रकाश रामचंद्र.<br>राहणार:– बनेसाहब पटांगण,सातभाई गल्ली. अहिल्यानगर | ४,४२,३७६/– |
| ८ | २९९ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री.जिंदम विनोद गंगाराम<br>राहणार :– २३ ब, राजराजेश्वर निवास, विठ्ठल मंदिराजवळ, पाईपलाईनरोड,भिस्तबाग, अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री. फुला गंगाराम लक्ष्मणराव<br>राहणार:– घर नं २०/१०, सर्जेपुरा, दुकान गाळा नं३८., पारनाईकगल्ली, वाडियापार्क, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) सौ. सविता रामदास जिंदम<br>राहणार:– २३/ब, राजराजेश्वर निवास, विठ्ठल मंदिराजवळ, पाईपलाईन रोड, भिस्तबाग, अ.नगर | १,९२,२५९/– |
| ९ | ३०० ---- २०२६ | जाबदेणार १ श्री. राकेश श्रीनिवास पासकंटी<br>राहणार :– घर नं ४४६४, टांगेगल्ली,विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री. नरेश अशोक वडीशेरला<br>राहणार :– जाधवमळा,बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. रविंद्र लक्ष्मण दासरी<br>राहणार :– प्लॉट नं २४१,भावनाऋषी सोसायटी, कल्याणरोड, अहिल्यानगर | ६३,०३४/– |
| १० | ३०१ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री बुटला गणेश श्रीहरी<br>राहणार :– घर नं.२१२ पाईपलाईन हडको आंबेडकर चौक,सावेडी अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) दासर सुधीर गंगाधर<br>राहणार:– पाईपलाईन हडको,पद्मानगर वैष्णवी मंदिराजवळ,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री पिसाट संजय शरद<br>राहणार:–पितळे कॉलनी ३९७ नागापूर,अहिल्यानगर. | ४,०८,९७२/– |
| ११ | ३०२ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री.आमकर दिपक विलास<br>राहणार :– शिवानंद अपार्टमेंट गाडगीळ पटांगण,नालेगाव,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री .सोनवणे आशिष फ्रान्सिस<br>राहणार :–गाडेकर गल्ली २२०, भिंगार,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री. सामल सचिन विजयकुमार.<br>राहणार :–घर नं.६०१ भराडगल्ली,तोफखाना,चितळेरोड,अहिल्यानगर. | ८५,०००/– |
| १२ | ३०३ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री .सुरम मोहन लक्ष्मण<br>राहणार –: पंचरंग गल्ली,तोफखाना,अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री .धोत्रे राम नागुशेट<br>राहणार पापय्या गल्ली ३३ ४२, अहिल्यानगर .<br>जाबदेणार ३) श्री .शिवराम सुरेश रामूलू<br>राहणार –:श्रमिक नगर सावेडी अहिल्यानगर | २,५८,९७७/– |
| १३ | ३०४ ---- २०२६ | जाबदेणार १) सौ.दिकोंडा पूजा चंद्रकांत<br>राहणार :– विद्याकॉलनी,आदर्शनगर,नगर कल्याण रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री. हरबा संदीप बाळासाहेब<br>राहणार:– कोर्टाच्यामागे,हरबावाडा झारेकर गल्ली,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. लाटणे शैलेश बाळकृष्ण<br>राहणार:– नेप्तीनाका,नालेगाव,अहिल्यानगर | ८८,०३१/– |
| १४ | ३०६ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री. चिलवर गोविंद गणेश<br>राहणार :– घर नं क्र.९४.श्रमिकनगर,सावेडी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री गुरप अक्षय संजय<br>राहणार:– सर्वे नं/२/१/४९/०४८ प्लॉट २/४/२/३/६५– जयनगर. तपोवनरोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री.चंद्रकांत वडलाकोंडा अमोल<br>राहणार :– प्लॉट नं २१., संत नरहरीनगर, गुलमोहर रोड, अहिल्यानगर | १,३२,७१४/– |
| १५ | ३०७ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री –बिटला श्रीनिवास नरसय्या<br>राहणार :– ६११ नेहरू मार्केट,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) सौ. म्याना जयश्री प्रशांत<br>राहणार:– घर नं.१०१, सिमला कॉलनी, प्रशांतनगर,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री. म्याना भास्कर बालराज<br>राहणार:– घर नं. प्रशांतनगर,सिमला कॉलनी,१०१.अहिल्यानगर. | ६७,७३५/– |
| १६ | ३०८ ---- २०२६ | जाबदेणार १) श्री.गरुड रमेश पोशेट्टी<br>राहणार :– जुन्या स्वीट होम मागे,एकता कॉलनी,गुलमोहर रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री. गरुड शाम पोशेट्टी.<br>राहणार:– जुन्या स्वीट होम मागे,एकता कॉलनी,गुलमोहर रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) सौ. गरुड राधा रमेश<br>राहणार:– अंबिका पॅलेस नेतासुभाष चौक,अहिल्यानगर. | १,०८,८१४/– |

ठिकाण : अहिल्यानगर
दि.२५/०३/२०२६

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा),
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगर महापालिकेच्या माध्यमातून सिद्धी बागेचे लवकरच होणार नूतनीकरण

**महापौर–उपमहापौरांची बैठक, कन्सल्टंटकडून सादरीकरण; विविध सूचना देत विकास आराखड्यावर चर्चा**



नगर – सिद्धीबाग ही नगरची एकेकाळची ओळख होती. ती ओळख पुन्हा जिवंत करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून नूतनीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. यासाठी डीपीआर मंजुरीच्या अनुषंगाने कन्सल्टंटकडून सादरीकरण करण्यात आले असून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत, अशी माहिती महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सिद्धीबागेच्या नूतनीकरणासाठी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव व आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत कन्सल्टंटमार्फत सिद्धीबागेच्या विकास आराखड्याचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी मनपा महिला बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक निखिल वारे, जितू गंभीर, अभियंता आर. जी. मेहत्रे, गणेश गाडळकर आदी उपस्थित होते. सादरीकरणादरम्यान बागेच्या नूतनीकरणाच्या विविध बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली तसेच कन्सल्टंटला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

उपमहापौर अॅड. धनंजय जाधव म्हणाले की, काही दिवसांपूर्वी सिद्धी बागेची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार कन्सल्टंट नेमून सविस्तर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याचे सादरीकरण महापौर व आयुक्त यांच्या उपस्थितीत करण्यात आले. बैठकीत मिळालेल्या सूचनांनुसार आराखड्यात आवश्यक बदल करून अंतिम आराखडा मंजूर करण्यात येईल. सिद्धीबागेचे रूप पालटून नगरची ओळख अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ते म्हणाले.

आयुक्त यशवंत डांगे यांनीही सादरीकरणावेळी विविध सूचना मांडत बागेच्या विकासासाठी काही थीम्सची माहिती दिली. नागरिकांसाठी आकर्षक, सुबक व सर्व सुविधा असलेली बाग विकसित करण्याचा महापालिकेचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

# सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियामध्ये CEO पदावर प्रविण पाटील यांची नियुक्ती



नगर – सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रशी गेल्या दशकभरापासून नातं जपणारे आणि राज्यातील सायकलिंग चळवळीचे आधारस्तंभ ठरलेले प्रविण पाटील यांची सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियामध्ये Director General व Chief Executive Officer (CEO) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी १ एप्रिल रोजी नवी दिल्ली येथे आपल्या नव्या पदाचा कार्यभार स्वीकारला. ही नियुक्ती केवळ प्रविण पाटील यांच्या वैयक्तिक यशापुरती मर्यादित नसून, संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि राज्यातील सायकलिंग खेळासाठी एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.

गेल्या दहा वर्षांत प्रविण पाटील यांनी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रसोबत कार्य करताना खेळाच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे. कै. प्रताप जाधव यांच्या सहकार्याने त्यांनी राज्यात सायकलिंगसाठी भक्कम पायाभूत सुविधा उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच, भारतीय सायकलिंगच्या प्रगतीसाठी योगदान देणारे एशियन सायकलिंग कॉन्फेडरेशनचे माजी जनरल सेक्रेटरी सरदार ओंकार सिंग, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष पंकज सिंग आणि जनरल सेक्रेटरी मनिंदर पाल सिंग यांच्या कार्याचेही सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे विशेष कौतुक करण्यात आले. प्रविण पाटील यांच्या नव्या जबाबदारीच्या प्रवासात त्यांना एक सक्षम टीमची साथ लाभणार आहे. यात अजीत सिंग (टेक्निकल डायरेक्टर), डॉ. धर्मेंद्र लांबा, अंकाक्षा दहात, प्रिया चिप आणि राकेश कुमार यांचा समावेश आहे.

## जाहीर नोटीस

प्रति. **श्रीम.शहनाज अताहुल्ला पठाण (खान शहेनाज रफिक)**
रा.मु.पो.२१,मनीषा कॉम्प्लेक्स, मिठा नगर,कोंढवा खुर्द,पुणे शहर, ता.हवेली,जि.पुणे,ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्रीम. शहनाज अताहुल्ला पठाण (खान शहेनाज रफिक) यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्रीम. शहनाज अताहुल्ला पठाण (खान शहेनाज रफिक) यांचा जन्म दि.०१/०६/१९५० रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, श्रीम. शहनाज अताहुल्ला पठाण (खान शहेनाज रफिक) यांचा जन्म दि.०१/०६/१९५० रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्रीम.शहनाज अताहुल्ला पठाण (खान शहेनाज रफिक) यांचा जन्म दि.०१/०६/१९५० रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २७/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०२/०४/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे वडगांव गुप्ता येथील शेतजमिन** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**गट नंबर २०९ चे क्षेत्र ०हे.५४आर+पो.ख.० हे. ०३ आर असे एकूण क्षेत्र ०हे.५७ आर याचा आकार ०रु.८१ पैसे. यापैकी वडगांव गुप्ता–शेंडी बायपास रोडचे क्षेत्र सोडून उर्वरित संपुर्ण क्षेत्र ०हे. ४७आर + पो.ख. ०हे.०३ आर असे एकूण क्षेत्र ०हे.५० आर ही संपुर्ण शेतजमीन मिळकत. सदर शेतजमिनीमधून वडगांव गुप्ता–शेंडी बायपास रस्ता गेलेला असल्यामुळे सदर जमिनीचे दोन भाग झालेले असून सदर रस्त्याच्या उत्तर बाजूकडील क्षेत्र ०हे.२०आर असून दक्षिण बाजुकडील क्षेत्र ० हे.२७ आर आहे.**

**वडगांव गुप्ता–शेंडी बायपास रस्ताच्या उत्तर बाजूकडील ०हे.२० आर यांसी चतुःसीमा–**

पूर्वेस : गट नं.२०२ पैकी भाऊसाहेब मधुकर शेळके यांची जमिन
दक्षिणेस : वडगांव गुप्ता– शेंडी बायपास रस्ता
पश्चिमेस : गट नं.२१० पैकी अंकुश बोर्डे व विजय कदम यांची जमिन
उत्तरेस : गट नं.२०० पैकी राधाबाई सखाहरी बांगर यांची जमिन **व**

**वडगांव गुप्ता–शेंडी बायपास रस्त्याच्या दक्षिण बाजुकडील ० हे.२७ आर यांसी चतुः सीमा –**

पूर्वेस : गट नं.२०२ पैकी भाऊसाहेब मधुकर शेळके यांची जमिन
दक्षिणेस : गट नं.२०८
पश्चिमेस : गट नं.२१०/४ पैकी खळेकर यांची जमिन, गट नं.२१०/१ पैकी कासार यांची जमिन व गट नं.२१०/२ पैकी जगदाणे यांची जमिन
उत्तरेस : वडगांव गुप्ता– शेंडी बायपास रस्ता

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**१. किसन संताराम सोनवणे (आठ आणे म्हणजेच १/२ हिश्याचे मालक),** रा. घर नं. ३९९, साई लिला, सातभाई गल्ली, चितळे रोड, अहिल्यानगर. **२. गणपत विष्णु घोंगरे (आठ आणे म्हणजेच १/२ हिश्याचे मालक),** रा. पी.पी.एस. रोड, लोणी, ता. राहाता, जि, अहिल्यानगर.

**अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर
मो. नं. **9011678999. 9860805559**

# इन्शुरन्स अॅडव्हायजरवर टोळक्याचा पिस्तूल व धारदार शस्त्राने हल्ला

### जिम ट्रेनर विरुद्ध पोलिसांकडे तक्रार केल्याने झाला हल्ला, ७ ते ८ जणांवर गुन्हा दाखल

नगर – जिममध्ये स्टेरॉईड्स घेण्यास नकार दिल्याच्या रागातून आणि पोलीस अधिक्षक कार्यालयात तक्रार केल्याचा संताप मनात धरून एका जिम ट्रेनरने त्याच्या साथीदारांसह एका तरुणावर जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इंदिरा कॉलनीतील रहिवासी आणि इन्शुरन्स अॅडव्हायजर विवेक दामोदर आहिरे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आहिरे हे सावेडी परिसरातील एका जिममध्ये व्यायामासाठी जातात. तेथे जिम ट्रेनर सद्दाम हुसेन इद्रीस शेख याने आहिरे यांना शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी स्टेरॉईड्स घेण्याचा आग्रह धरला होता. आहिरे यांनी त्यास नकार दिला. या कारणावरून सद्दामने त्यांना जिममध्ये अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे आहिरे यांनी ३१ मार्च रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयात सद्दामविरुद्ध अर्ज दिला होता. याचाच राग मनात धरून रात्री दहाच्या सुमारास जेव्हा आहिरे हे त्यांच्या मित्रासोबत हॉटेलबाहेर उभे होते, तेव्हा सद्दामने त्यांना गाठले. माझ्याविरुद्ध अर्ज का दिला? असे विचारत त्याने आहिरे यांना धमकावले. त्यानंतर राधाबाई कॉलेजसमोर सद्दाम आणि त्याच्या ७ ते ८ साथीदारांनी आहिरे यांना अडवले. सद्दामने त्याच्या हातातील पिस्तूलने आहिरे यांच्या डोक्यावर प्रहार केला, तर त्याच्या साथीदारांनी धारदार शस्त्राने पाठीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या झटापटीत आहिरे यांच्या गळ्यातील सोन्याच्या चेनही हिसकावण्यात आल्या आहेत. जखमी आहिरे यांच्यावर सध्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी सद्दाम शेख सह त्याच्या साथीदारांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगर – पुणे महामार्गावरील हॉटेलवर 'एएचटीयु' पथकाचा छापा

### ४ पिडीत महिलांची सुटका, हॉटेल चालकासह दोघांवर गुन्हा दाखल

नगर – नगर – पुणे महामार्गावरील हॉटेल मध्ये सुरु असलेल्या कुंटणखान्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या (एएचटीयु) पथकाने छापा टाकत ४ पिडीत महिलांची सुटका केली आहे. या महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेणाऱ्या हॉटेल चालकासह दोघांवर सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाचे पो.नि. रविंद्र देशमुख यांना ३१ मार्च रोजी नगर पुणे रोडवरील जातेगाव (ता.पारनेर) शिवारात हॉटेल जयराज येथे वेश्या व्यवसायाकरिता महिलांना रूम उपलब्ध करून देवून त्यांचेकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यामुळे पो.नि. देशमुख यांनी नियंत्रण कक्षातील पो.नि. हमीद शेख यांच्या सह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पो. नि. हमीद शेख यांनी पथकासह जावून पंचांसमक्ष बनावट ग्राहक पाठवून खात्री करून हॉटेल जयराज येथे जावून छापा टाकला असता सदर ठिकाणी कलंदर सत्तारअली शेख (रा. वडू रोड, कोरेगाव भिमा, ता. शिरूर जि. पुणे), हनुमंत अशोक देटके (रा. नागटापी, सासपडी, ता.जि. सातारा) हे दोघे मिळून आले. तसेच सदर ठिकाणी असलेल्या रूमची झडती घेतली असता सदर ठिकाणी रूममध्ये ४ महिला मिळून आल्या. सदर महिलांची सुटका करण्यात आलेली असून दोघा आरोपींना ताब्यात घेवून आरोपी व पिडीत महिला यांना सुपा पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले. दोघा आरोपींवर सुपा पोलीस स्टेशन येथे स्त्रिया व मुली यांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५, ७, ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधिक्षक गणेश उगले, पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हमीद शेख, स.फौ. शकील शेख, महिला पो. हे.कॉ. अर्चना काळे, अनिता पवार, चालक पो.कॉ. एस.एस. काळे यांच्या पथकाने केली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०२/०४/२०२६**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे निंबळक येथील **सर्व्हे नंबर १८०/१/२/२/४०९/१ मधील** खालील वर्णनांच्या प्लॉट मिळकती–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मीटर | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १६ | ४१०.९६ हा संपूर्ण प्लॉट | प्लॉट नंबर १७ | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | लागू सर्व्हे नंबर पैकी मिळकत | लागू सर्व्हे नंबर पैकी मिळकत |
| १७ | ४१०.२२ हा संपूर्ण प्लॉट | प्लॉट नंबर १८ | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर १६ | लागू सर्व्हे नंबर पैकी मिळकत |
| १८ | ४०९.४८ हा संपूर्ण प्लॉट | प्लॉट नंबर १९ | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर १७ | लागू सर्व्हे नंबर पैकी मिळकत |
| १९ | ४९३.३३ हा संपूर्ण प्लॉट | १५.०० मीटर रुंदीचा रस्ता | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर १८ | लागू सर्व्हे नंबर पैकी मिळकत |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक– श्री.नरेंद्र संपतलाल बाफना** (HUF)
रा.माणिकनगर, अहिल्यानगर

**अॅड.अंकिता अनिल शर्मा** (पगारिया), **अॅड. गणेश एम.शर्मा**
फोन : नं.२३४११०६, मो : ९४२२२२०८४५, ऑफिस नं.१४,१७, पहिला मजला, श्री.आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर.

